



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २२.०९.२०२६ | अंक नं. १४८ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020







# गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये डीजे व प्लाझ्मा-लेझरला मनाई

**पारंपारिक वाद्यांचा वापर करावा, आदेशाचा भंग केल्यास होणार कारवाई : पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन**



नगर – गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनी प्रदूषणासह अन्य नियमांचे पालन करावे. प्लाझ्मा-लेझरचा वापर करू नये तसेच मोठ्या आवाजातील डीजे न वाजवता पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचा भंग करून ध्वनी प्रदूषण करणार्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिला.

१४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरूवात झाली असून, अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात सार्वजनिक गणेश मंडळांकडून गणरायाचे स्वागत करताना अनेक मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत तसेच कमी आवाजातील साऊंड सिस्टीमचा वापर करीत पोलिसांना सहकार्य केले. आता गणेश विसर्जन मिरवणुकीची तयारी सुरु झाली असून, २५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन मिरवणुका मोठ्या प्रमाणावर निघणार आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीत मोठ्या आवाजातील डीजे, प्लाझ्मा-लेझर आणि ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा यावर्षी अधिक चर्चेत आला आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या स्तारावर सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी, मंडळांचे प्रमुख तसेच डीजे चालक व मालक यांच्या बैठका घेण्यात आल्या आहेत. या बैठकांमध्ये मिरवणुकीदरम्यान डीजेचा वापर करू नये, प्लाझ्मा-लेझर बंद ठेवावेत तसेच ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरणार्या उपकरणांचा वापर टाळावा, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. तशा नोटीसा संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सव हा धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव असल्याने मंडळांनी पारंपरिक वाद्यांचा वापर करून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवावे, असे आवाहन अधीक्षक सुदर्शन यांनी केले आहे. ढोल-ताशे, लेझीम तसेच अन्य पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून उत्सव साजरा करताना ध्वनी मर्यादांचेही पालन करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मोठ्या आवाजातील डीजेमुळे नागरिकांना त्रास होण्याबरोबरच ध्वनी प्रदूषणाचे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे डीजेच्या वाढत्या आवाजाबाबत नागरिकांमधूनही चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून प्रशासन आणि पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन अधीक्षक सुदर्शन यांनी केले आहे.

विसर्जन मिरवणुकीत उत्साहाच्या भरात नियमांचे उल्लंघन होऊ नये, यासाठी पोलिसांकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या ध्वनी प्रदूषणासंदर्भातील नियमांचे पालन करणे प्रत्येक मंडळाची आणि संबंधितांची जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करून मोठ्या आवाजात डीजे वाजविणे किंवा प्लाझ्मा-लेझरचा वापर करणे आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अधीक्षक सुदर्शन यांनी दिला आहे.

# खोटे सोने देऊन व्यावसायिकाची १ लाख रुपयांची केली फसवणूक

**आनंदऋषीजी मार्ग परिसरातील घटना, दोघा भामट्यांच्या विरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

नगर – अहिल्यानगर शहरातील आनंदऋषीजी मार्ग परिसरामध्ये दोन भामट्यांनी एका हॉटेल चालकाचा व त्याच्या पत्नीचा विश्वास संपादन करून स्वस्तात सोन्याचे दागिने देण्याचे आमिष दाखवत पिवळ्या धातूची सोन्यासारखी दिसणारी खोटी मोहनमाळ देऊन त्यांच्याकडून रोख एक लाख रुपये घेत त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुरेश खुसरु चिपोले (वय ४३, रा. शंभर फुटी कॉलनी, नागरदेवळे, बुऱ्हाणनगर, अहिल्यानगर) हे आनंदऋषी मार्ग परिसरातील पॉलिटेक्निक कॉलेजसमोर, परंपरा हॉटेलजवळ 'बालाजी उडपी सेंटर' नावाची हातगाडी चालवतात. २१ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास दोन अनोळखी इसम त्यांच्या हातगाडीवर आले. आरोपींनी फिर्यादी आणि त्यांच्या पत्नीचा विश्वास संपादन करून त्यांना स्वस्तात सोन्याचे दागिने देण्याचे आमिष दाखविले.

या अमिषाला चिपोले दाम्पत्य बळी पडले. त्यांना या दोघांनी सोन्यासारखी दिसणारी पिवळ्या धातूची मोहनमाळ दिली. त्या बदल्यात त्यांच्याकडून १००, २०० आणि ५०० रुपयांच्या वेगवेगळ्या दरांच्या नोटा असलेली एकूण एक लाख रुपयांची रोकड घेऊन तेथून पोबारा केला. काही वेळाने सदर मोहनमाळ ही सोन्याची नसून खोटी आहे असे चिपोले दाम्पत्याच्या निदर्शनास आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी कोतवाली पोलीस ठाणे गाठून आपबिती सांगितली.

चिपोले यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कोतवाली पोलिसांनी दोन्ही अज्ञात इसमांविरोधात (मोबाईल क्रमांक ९०५७७३६९८८) फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे करत आहेत.

# भिंगारमध्ये २३ सप्टेंबरला गणेश विसर्जन मिरवणूक

**पोलीस प्रशासन सज्ञ, मोठा बंदोबस्त तैनात; डीजेला 'नो एन्ट्री'**

नगर – नगर शहरापासून काही अंतरावर असलेल्या भिंगार येथील गणेश विसर्जन मिरवणूक २३ सप्टेंबर रोजी निघणार आहे. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासन सज्ञ झाले असून ,मिरवणूक मार्गावर कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या मिरवणुकीत डीजेच्या दणदणाटाला बंदी घालण्यात आली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्वी थोरात यांनी दिली.

भिंगार शहरामध्ये दरवर्षी परंपरेप्रमाणे वामनजयंतीच्या दिवशी गणेश विसर्जन केले जाते. दरवर्षी साधारणपणे आठव्या दिवशी ही विसर्जन मिरवणूक काढली जाते, मात्र या वर्षी एक तिथी वाढल्याने गणेशोत्सव १२ दिवस असल्याने ९ व्या दिवशी २३ सप्टेंबर रोजी ही मिरवणूक काढली जाणार आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत भिंगार शहर व नगर तालुक्यातील ११ गावे यामध्ये सुमारे ९६ सार्वजनिक गणेश मंडळांनी गणेशाची प्रतिस्थापना केलेली आहे.

भिंगारमधील गणेश विसर्जन मिरवणुकीत पारंपारिक १२ मंडळांचा सहभाग असणार आहे. मानाच्या देशमुख गणपतीची उत्थान पूजा पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते होवून दुपारी पारंपरिक वाद्यात मिरवणूक निघेल .त्यानंतर सायंकाळी विविध गणेश मंडळांकडून मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या परिसरातील एकूण १२ सार्वजनिक गणेश मंडळांचा मिरवणुकीत सहभाग असेल. या मिरवणुकीसाठी मोठा बंदोबस्तही तैनात करण्यात आलेला आहे. विविध पोलीस अधिकारी तसेच होमगार्ड आणि राज्य राखीव दलाचे पथकही मिरवणूक मार्गावर तैनात असणार आहेत. या मिरवणुकीत डीजेच्या दणदणाटाला बंदी घालण्यात आली आहे. केवळ २ बेस आणि २ टॉप लावता येणार आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तसेच मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे कृत्य करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पाडावी असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# सराफ बाजारामध्ये दुकानासमोरील वाहन काढण्यावरून प्राणघातक हल्ला

नगर – शहरात सराफ बाजार भागातील भोलेनाथ मंदिरासमोरील दुकानासमोर मोटारसायकल लावण्यावरून झालेल्या वादातून वृद्धावर टणक वस्तूने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पिता-पुत्राविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत महंत मधुकरराव जक्कल (वय ७२, रा. एकता कॉलनी, गोविंदपुरा, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे सराफ बाजार येथील भोलेनाथ मंदिराजवळ दुकान आहे. २१ सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दुकानासमोर लावलेली मोटारसायकल बाजूला काढून घेण्यावरून हा वाद झाला. या वादातून आरोपी रामेश्वर थोरात याने फिर्यादी मधुकरराव जक्कल यांना पाठीमागून धरले आणि शिवीगाळ केली. त्यानंतर त्याचा मुलगा युवराज रामेश्वर थोरात (दोघे रा. वंजारगल्ली, अहिल्यानगर) याने हातातील एका टणक वस्तूने जक्कल यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले व दोघेही तेथून पसार झाले. हल्ल्यात जखमी झालेल्या फिर्यादी मधुकरराव जक्कल यांना उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात पितापुत्राविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन गायकवाड करत आहेत.

# मार्केटयार्ड परिसरात सरकारी अधिकाऱ्याला मारहाण; गुन्हा दाखल

## कागदपत्रे फाडून जीवे मारण्याचीही दिली धमकी

नगर – शहरातील महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड परिसरात सहाय्यक सहकार अधिकाऱ्याला धक्काबुक्की व मारहाण करत शासकीय कामात अडथळा आणल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत उपनिबंधक सहकारी संस्था, अहिल्यानगर येथील सहाय्यक सहकार अधिकारी देविदास दानिअल पारधे (रा. भवानीनगर, मार्केट यार्ड जवळ, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २१ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० ते ४ या कालावधीत आपल्या कार्यालयातील टपाल सेक्शन येथे उभे होते. यादरम्यान अल्ताफ गुलाब सय्यद (रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर) हा व्यक्ती आपले सुनावणी लेटर घेण्यासाठी तिथे आला होता.

आरोपीने पारधे यांच्याकडे पाहून जोरजोरात आरडाओरडा केला. तू तुझ्याकडील अर्ज चौकशीचे अहवाल अधिकाऱ्यांच्या बाजूने देतो का, थांब तुझी कशी जिरवतो, असे म्हणत आरोपीने त्यांना धक्काबुक्की व मारहाण केली. तसेच हातातील फाईल्स खाली पाडून पँटच्या खिशातून स्क्रू ड्रायव्हर काढून अंगावर उगारला व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी अल्ताफ सय्यदविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक दिपक मेढे करत आहेत.

## आरोपीकडूनही मारहाणीची तक्रार

दरम्यान गुन्हा दाखल झालेला आरोपी अल्ताफ गुलाब सय्यद यानेही कोतवाली पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रार दिली आहे. या नुसार सय्यद हे २१ सप्टेंबर रोजी दुपारी उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयात गेले असता तेथे असलेले देविदास पारधे, सुरेश बनसोडे, वाहनचालक आकाश, अश्विनी खरपुडे आदींनी शिवीगाळ दमदाटी करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच पुन्हा आमच्या विरोधात तक्रार अर्ज केल्यास जीवे मारून टाकू अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे.

# जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी पावसाची हजेरी; खरीप पिकांना जीवदान

**भंडारदरा तुडुंब; प्रवरा नदीत ३१४७ क्युसेकने विसर्ग, निळवंडेतही पाण्याची आवक**

नगर – जिल्ह्यात सलग दुसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली. २० सप्टेंबर नंतर २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी आणि रात्री जिल्ह्यातील विविध भागांत पाऊस झाला. पावसाने दडी मारल्याने सुकू लागलेल्या खरीप पिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी नदी, नाले, विहिरी आणि कूपनलिका अद्याप कोरड्या असल्याने मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

महसूल विभागाच्या आकडेवारीनुसार, कोपरगाव, श्रीरामपूर आणि राहाता हे तीन तालुके वगळता जिल्ह्यात सर्वत्र पावसाची नोंद झाली. अहिल्यानगर शहरात सोमवारी सायंकाळी जोरदार पाऊस झाला. नालेगाव मंडळात सर्वाधिक पावसाची नोंद झाली. तसेच अहिल्यानगर तालुक्यातील चिंचोडी पाटील आणि वाळकी मंडळातही चांगला पाऊस झाला.

गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप पिके सुकू लागली होती. पिकांना पाण्याची गरज असताना पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत होते. खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर सोमवारी झालेला पाऊस शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरला आहे. मात्र, हा पाऊस सर्वदूर आणि पुरेसा नसल्याने मोठ्या पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे.

## भंडारदरा तुडुंब; प्रवरा नदीत विसर्ग

दरम्यान, भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात अधूनमधून मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणात नवीन पाण्याची जोरदार आवक होत आहे. ११,०३९ दलघफू क्षमतेचे भंडारदरा धरण तुडुंब भरलेले असल्याने सोमवारी सायंकाळी या धरणातून ३१४७ क्युसेकने प्रवरा नदीत पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला.

हे पाणी निळवंडे धरणात जमा होत असून, निळवंडे धरणातील पाणीसाठा ८०१७ दलघफू झाला आहे. या धरणातूनही १४६९ क्युसेकने प्रवरा नदीत पाणी सोडण्यात येत आहे.

## पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस

२१ सप्टेंबर रोजी सकाळी संपलेल्या २४ तासांत भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात विविध ठिकाणी पावसाची नोंद झाली. त्यामध्ये भंडारदरा २८ मिमी, निळवंडे ४० मिमी, रतनवाडी ५६ मिमी, घाटघर ३० मिमी, पांजरे १४ मिमी आणि वाकी ३० मिमी पावसाची नोंद झाली.

दरम्यान, कोतुळ परिसरातही पावसाची संततधार सुरु असल्याने मुळा नदीतील पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे धरणाकडे होणारी पाण्याची आवकही वाढत आहे. जिल्ह्यात काही भागांत पावसाने दिलासा दिला असला, तरी खरीप पिकांसह जलस्रोतांना पुरेसा आधार मिळण्यासाठी आणखी दमदार पावसाची गरज कायम आहे.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# महावितरणकडून सव्वालाख रुपयांची वीज चोरी उघडकीस

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे महावितरणच्या भरारी पथकाने मोठी कारवाई करत वीज चोरीचा प्रकार उघडकीस आणला आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात विलास मच्छिंद्र पुंड (रा. सारोळा कासार, ता. नगर) याच्या विरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास सारोळा कासार (ता. नगर) येथील सर्व्हे नंबर ७७ मधील जागेवर ही कारवाई करण्यात आली. या ठिकाणी वीज चोरी केली जात असल्याची माहिती मिळाल्यावर भरारी पथकाने छापा टाकला. यावेळी आरोपी विलास मच्छिंद्र पुंड याने मागील सात महिन्यांच्या काळात एकूण ६५४७ युनिट्सची वीज चोरी करून महावितरण कंपनीचे एकूण १लाख १२ हजार ८३ रुपयांचे आर्थिक नुकसान केले तसेच तडजोडीचे बिलही भरले नाही.

या प्रकरणी महावितरणच्या भरारी पथकाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता दीपक बाळकृष्ण घारे (वय ४३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विलास मच्छिंद्र पुंड या आरोपीविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस नाईक शिवाजी माने करत आहेत.

# नगर– कल्याण महामार्गावर भरधाव पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

नगर – नगर कल्याण महामार्गावर पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या शिवारामध्ये भरधाव पिकअप गाडीने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना २१ सप्टेंबरला दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास घडली आहे. साहिल कैलास इंगावले (वय २१, रा. म्हसोबा झाप, ता. पारनेर) असे मयत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत साहिल कैलास इंगावले हा तरुण आपली हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. एमएच १४ जेके ७४९९) स्वतः चालवत नगर कल्याण महामार्गावरून जात होता. कर्जुले हर्या गावाचे शिवारामध्ये बाबा का ढाबा हॉटेलसमोर अहिल्यानगरकडे जाणाऱ्या महिंद्रा मॅक्स पिकअप गाडीचा (क्र. एमएच १६ डीपी १८१२) चालक दिनेश पंढरीनाथ खोडदे (रा. भनगडवाडी, ता. पारनेर) याने आपली गाडी भरधाव वेगात चालवून विरुद्ध बाजूने येऊन दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात साहिल यास गंभीर दुखापत होऊन त्याचा मृत्यू झाला तसेच दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. अपघात घडल्यानंतर चालक कोणतीही मदत न करता घटनास्थळावरून पळून गेला. या प्रकरणी बाळासाहेब छगन झावरे (रा. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर) यांच्या फिर्यादीवरून पिकअप चालक दिनेश खोडदे याच्या विरुद्ध पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# धिरज परदेशी हत्या प्रकरणातील आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला

नगर – अहिल्यानगर येथील बहुचर्चित धिरज परदेशी हत्या प्रकरणातील पाचही आरोपींचे जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावले आहेत. कोर्ट क्र. १ चे न्यायाधीश आर.एस. गुप्ता यांनी हा निर्णय दिला आहे.

सदर हत्येची घटना ७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास मुकुंदनगर येथील दर्गा दायरा कब्रस्तानजवळ घडली. फिर्यादी अक्षय मुळे, मयत धिरज परदेशी व काव्य गणेश तावरे हे स्ट्रीट लाईट पॅनल्सचे काम करत असताना, आरोपी मेहराज सैयद, सिराज सैयद, मुस्तकीन सैयद, युनुस शेख व इतर २–३ अनोळखी इसमांनी बेकायदेशीर जमाव जमवून त्यांच्या हातातील लाकडी बल्ल्यांनी व लोखंडी पाईपने धिरज परदेशी यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या धिरज परदेशी यांना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते, जिथे उपचारादरम्यान ९ ऑगस्ट रोजी दुपारी दोन वाजता त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी पोलिसांनी तपासादरम्यान युनुस खानसाहेब शेख, वसीम रहिम सैयद, इम्रान मुसा सैयद, अरमान लियाकत सैयद, मोहम्मद इर्शाद इम्रान सैयद या आणखी ९ आरोपींची नावे निष्पन्न केली होती. या आरोपींनी न्यायालयात नियमित जामीनासाठी अर्ज दाखल केले होते. सदर प्रकरणाची सुनावणी होताना सरकारी पक्षाच्यावतीने जोरदार युक्तिवाद करण्यात आला. ही घटना घडवून आणण्यासाठी आरोपींनी पूर्वनियोजित कट रचला होता आणि या प्रकरणाचा तपास अजून प्राथमिक स्तरावर असून आरोपींची ओळख परेड होणे बाकी आहे.

यासह विविध मुद्द्यांवर सरकारी पक्षाने युक्तिवाद मांडला. सरकारी पक्षाचा हा भरभक्कम युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपींचे नियमित जामीन अर्ज फेटाळून लावले आहेत. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील ॲड. पुष्पा कापसे–गायके यांनी काम पाहिले असून त्यांना ॲड. सुहास टोणे, ॲड. सागर टाक व ॲड. अमित गाडेकर यांनी सहकार्य केले.

## सुवालाल गांधी (सर) यांचे अल्प आजाराने निधन



नगर – विनायक रेसिडेन्सी, सारसनगर येथील सुवालाल कचरदास गांधी (टाकळीवाला) (गांधी सर) (वय ८५) यांचे २२ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. धीरज (मर्चंट बँक), योगेश गांधी यांचे वडील तर नेनसुख भंडारी व नवनीत मुनोत यांचे ते सासरे होत.

## कुसुमबाई बोराटे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पाईपलाईन रोड येथील रहिवासी श्रीमती कुसुमबाई नारायण बोराटे (वय ८५) यांचे २१ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २२ सप्टेंबर रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अ.नगर येथील सुनील खानावळ मंगलगेट व पाईपलाईन रोड येथील सागर हॉटेलचे संचालक अरुण, राजू व अशोक बोराटे यांच्या त्या मातोश्री होत.

# आरक्षित व खुल्या प्रवर्गातील आंतरजातीय दाम्पत्यांच्या मुलांना ‘आरक्षणातील निम्म्या जागांवर’ प्राधान्य द्यावे

**एक पालक आरक्षित आणि दुसरा खुल्या प्रवर्गातील असण्याची अट; पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेचे २३ सप्टेंबरला अहिल्यानगरमध्ये आंदोलन**

नगर – जातिनिर्मूलनासाठी एक पालक आरक्षित प्रवर्गातील आणि दुसरा खुल्या (अनारक्षित) प्रवर्गातील असलेल्या आंतरजातीय दाम्पत्यांच्या मुलांना शिक्षण व शासकीय नोकऱ्यांमधील विद्यमान आरक्षित जागांपैकी ५० टक्के जागांवर प्रथम प्राधान्य द्यावे, अशी मागणी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात येणार आहे. या मागणीसाठी २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे आंदोलन होणार आहे.

या प्रस्तावानुसार, आई किंवा वडील यांपैकी कोणताही एक पालक संबंधित आरक्षित प्रवर्गातील आणि दुसरा खुल्या प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. येथे ‘खुल्या प्रवर्गातील पालक’ म्हणजे जातिआधारित आरक्षणाच्या प्रवर्गांबाहेरील पालक, असा अर्थ अभिप्रेत आहे. अशा आंतरजातीय विवाहातून जन्मलेल्या मुलांनाच प्रस्तावित विशेष वाट्याचा लाभ मिळावा, अशी भूमिका पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ॲड. कारभारी गवळी यांनी मांडली आहे.

आपल्याच जातीत विवाह करण्याची प्रथा जातिव्यवस्था टिकवून ठेवणारा महत्त्वाचा घटक असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. आरक्षित आणि खुल्या प्रवर्गांतील व्यक्तींमधील स्वेच्छेच्या आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन मिळाल्यास जातीय अंतर कमी होण्यास आणि सामाजिक बंधुता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. विवाहासाठी व्यक्तीचे गुण, विचार, परस्पर संमती आणि समान प्रतिष्ठा यांना महत्त्व मिळावे, अशी या उपक्रमामागील भूमिका आहे.

आंतरजातीय विवाह करणाऱ्या कुटुंबांना काही वेळा सामाजिक विरोध, बहिष्कार किंवा असुरक्षिततेला सामोरे जावे लागते. अशा कुटुंबांना संरक्षण देण्याबरोबरच त्यांच्या मुलांच्या शिक्षणाला आणि रोजगाराच्या संधींना आधार देण्यासाठी शासनाने ठोस धोरण स्वीकारावे, अशी मागणी संघटनांनी केली आहे.

प्रस्तावित ५० टक्के विशेष वाटा शिक्षण व शासकीय नोकऱ्यांमधील विद्यमान आरक्षित जागांमधून उपलब्ध करून द्यावा, असे या मागणीत नमूद करण्यात आले आहे. त्यासाठी सामाजिक न्याय, आरक्षणाचा घटनात्मक उद्देश, संबंधित मुलांची पात्रता आणि इतर पात्र वंचित घटकांचे हित विचारात घेऊन आवश्यक कायदेशीर व धोरणात्मक तरतुदी कराव्यात, अशी संघटनांची अपेक्षा आहे.

जातिनिर्मूलनाला चालना देण्यासाठी जनजागृतीसोबत सामाजिक संरक्षण, शैक्षणिक संधी आणि रोजगारविषयक प्रोत्साहन यांची जोड आवश्यक असल्याचे संघटनांनी म्हटले आहे. या प्रयत्नांतून पुढील २० ते २५ वर्षांत जातिभेदमुक्त भारताच्या दिशेने परिवर्तन घडविण्याचे ध्येय त्यांनी व्यक्त केले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा या घटनात्मक मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी ही मागणी मांडण्यात येत आहे.

जात पाहून नाती ठरविण्याची मानसिकता बदलली पाहिजे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारलेली कुटुंबव्यवस्था घडविण्यासाठी समाज आणि शासनाने पुढाकार घ्यावा, अशी भूमिका ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केली आहे. या मागणीचा सविस्तर प्रस्ताव २३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होणाऱ्या आंदोलनात मांडण्यात येणार आहे. आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले, अमित थोरात आदी प्रयत्नशील आहेत.

## विष्णू सुवर्णपाठकी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – गुजरगल्ली येथील रहिवासी विष्णू नारायण सुवर्णपाठकी (दादा) (वय ६८) यांचे २१ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. गोपाल सुवर्णपाठकी यांचे ते बंधू होत.

# जिल्ह्यात २२ व २३ सप्टेंबरला पावसाचा ‘यलो अलर्ट’ जारी

नगर – भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यात आगामी दोन दिवस हवामानात बदल होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने जिल्ह्यासाठी २२ आणि २३ सप्टेंबर रोजी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा दिला असून, या कालावधीत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने जारी केलेल्या बुलेटिननुसार २२ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ३० ते ४० किलोमीटर प्रति तास वेगाने सोसाट्याचा वारा सुटण्याची शक्यता आहे.

२३ सप्टेंबर रोजी वादळी वाऱ्याचा जोर वाढण्याचा अंदाज असून, तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि ४० ते ५० किलोमीटर प्रति तास वेगाने सोसाट्याचा वारा वाहू शकतो. हवामानातील या बदलामुळे शेतीपिकांचे नुकसान होऊ नये, यासाठी शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी आणि सुरक्षितता बाळगावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. विजा चमकत असतील त्यावेळी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.



गौरी गणपती निमित्त योगेश पाथरकर यांच्या घरी ‘गोकुळनगरी’ हा देखावा सौ. दिपाली पाथरकर यांनी तयार केला आहे.

## गजानन कुलथे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – केडगाव येथील शाहुनगर, विठ्ठल मंदिरा जवळील रहिवासी गजानन धोंडीराम कुलथे (वय ७०) यांचे २१ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. केडगाव येथील आराध्य मेडीकल, राहुल व सचिन कुलथे, प्रियंका मैड यांचे ते वडील होत.

## भागवत भाकरे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – पाईपलाईन रोड येथील आशियाना कॉलनीतील रहिवासी भागवत लिंबाजी भाकरे (वय ५९) यांचे २१ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ऋषिकेश भाकरे यांचे ते वडील होत. ॲड. ए. के. गुगळे व ॲड. एल. बी. पल्लोड यांच्याकडे ते क्लार्क म्हणून कार्यरत होते.

## ॲड. दिपक भंडारी यांचे अल्प आजाराने निधन



कर्जत – येथील रहिवासी ॲड. दिपक हरकचंद भंडारी (वय ६२) यांचे २२ सप्टेंबर रोजी पुणे येथे उपचारा दरम्यान अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कर्जत अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ भाऊ, भावजया, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कर्जत येथील ॲड. सुरेश, संतोष भंडारी यांचे बंधू तर ॲड. शुभम, ॲड. अंकित भंडारी यांचे ते वडील होत.

## शाहीन अजिज शेख यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील फातेमा हौसिंग सोसायटीतील शाहीन अजीज शेख (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, जेठ, जाव, पुतणे, नणदा असा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेतील निवृत्त शिक्षक अजीज गफूरभाई शेख यांच्या त्या पत्नी तर काँग्रेसचे नजीर गफुरभाई शेख यांच्या भावजई तसेच पत्रकार निसार सय्यद, प्रा.अन्सार सय्यद, डॉ.यासीन सय्यद यांच्या भगिनी होत. त्यांचा दफनविधी श्रीरामपूर येथील कब्रस्तानमध्ये करण्यात आला.

# स्थायी समिती सभेत ३०० कोटी रुपयांच्या ३३ रस्त्यांसह विविध विकासकामांना मंजुरी

**गैरहजर अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याचे सभापती पै. सुभाष लोंढे यांचे आदेश**

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या स्थायी समितीची सभा सभापती सुभाष लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली २२ सप्टेंबर रोजी दुपारी झाली. या सभेत शहरातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा होऊन विविध विषयांना मंजुरी देण्यात आली. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत शहरातील नवीन ३३ रस्त्यांच्या विकासकामांसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता व्यवस्थापन सल्लागार संस्था नियुक्त करण्यास मंजुरी देण्यात आली. या रस्ते विकासासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याची माहिती सभेत देण्यात आली.



स्थायीच्या सभेत बोलताना सभापती सुभाष लोंढे. (छायाचित्र – लहू दळवी)

सभेला बाबासाहेब वाकळे, सदस्य मनोज कोतकर, सुरेश बनसोडे, आकाश कातोरे, सोनाबाई शिंदे, संध्या पवार, मीनाताई चोपडा, गंभीर, हरप्रीत कौर, पूर्णिमा गव्हाळे, सुनिता गेणाप्पा, सेहनाज शेख, नगरसचिव मेहर लहारे आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला स्थायी समिती सभापती व सदस्यांनी विविध विषयांवर चर्चा करून विषयांना मंजुरी दिली. यावेळी सभापती सुभाष लोंढे यांनी अधिकारी ठराविक लोकांचीच कामे करीत असल्याची चर्चा असल्याचे सांगत, नव्याने निवडून आलेल्या सदस्यांच्या कामांनाही प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. नगरसेवकांचा मान–सन्मान राखून त्यांनी सांगितलेली कामे तातडीने मार्गी लावावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर विसर्जन मार्गाचे नियोजन करून नागरिकांना त्याची माहिती द्यावी, आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती करावी, तसेच नेप्ती नाका येथील बारवेची स्वच्छता करण्याचे निर्देश सभापतींनी दिले. सभेला गैरहजर राहिलेल्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेशही त्यांनी दिले.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत नवीन ३३ रस्त्यांच्या कामांसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचा विषय सभेत मांडण्यात आला. यावेळी पारखे यांनी सुमारे ३०० कोटी रुपयांचा निधी आवश्यक असल्याचे सांगितले. प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी व्यवस्थापन सल्लागार संस्था नियुक्त करण्याचा हा विषय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावर माजी महापौर बाबासाहेब वाकळे, सुरेश बनसोडे आणि सभापती पै. सुभाष लोंढे यांनी रस्त्यांच्या प्रकल्प अहवालात पाण्याच्या लाईन, विद्युत खांब, तारा, अतिक्रमणे आदींची सविस्तर माहिती असणे आवश्यक असल्याचे सांगितले. ही माहिती आधीच अहवालात आल्यास अतिक्रमणे वेळेत हटविता येतील आणि प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर अडचणी निर्माण होणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

पारखे यांनी संबंधित कंपनी सर्वेक्षण करून अहवाल तयार करेल. त्यानंतर राज्य शासनाकडून तांत्रिक मंजुरी घेण्यात येईल. निधी मंजूर झाल्यानंतर निविदा प्रक्रिया, कामावर नियंत्रण, देयके आदी कामे संबंधित एजन्सी करेल, अशी माहिती दिली. यावर सभापतींनी परिपूर्ण व सर्व बाबींचा समावेश असलेला अहवाल तयार करण्याचे निर्देश देत विषयाला मंजुरी दिली.

सभापतींनी विसर्जन मार्गावरील रस्त्याचे काम झाले आहे का, अशी विचारणा केली. त्यावर पारखे यांनी बाजारपेठेतील कामे झाल्याचे सांगितले. बाबासाहेब वाकळे यांनी निविदा घेऊनही वेळेत कामे पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांना भविष्यात नवीन निविदा भरता येणार नाही, अशी तरतूद करण्याची मागणी केली. त्यावर पारखे यांनी संबंधित ठेकेदारांना नोटिसा देण्यात आल्या असून कामाला विलंब झाल्यास दंड आकारण्यात येत असल्याचे सांगितले.यावर सभापतींनी कामांना वेळेचे बंधन घालण्याचे निर्देश देत कामे निर्धारित वेळेतच पूर्ण झाली पाहिजेत, यासाठी ठोस उपाययोजना करण्याचे आदेश दिले.

मनोज कोतकर यांनी कचरा डेपोमध्ये कचऱ्याचे मोठमोठे ढीग असल्याचा मुद्दा उपस्थित केला. हे ढीग कशासाठी करण्यात आले आहेत, अशी विचारणा त्यांनी केली. त्यावर शरद जाधव यांनी कचऱ्यावर प्रक्रिया केली जात असल्याचे सांगितले. सभापती पै. सुभाष लोंढे आणि बाबासाहेब वाकळे यांनी कचरा प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता किती टन आहे, दररोज किती कचरा येतो आणि त्यापैकी किती कचऱ्यावर प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जाते, याची माहिती मागितली.

मनोज कोतकर यांनी शहरातील ओढे–नाले सफाईचे किती काम झाले, याची माहिती सभेत मागितली. अनिकेत बल्लाळ यांनी कामाची माहिती देताना केडगावातील दौंड रोडवर नालेसफाईचे काम सुरू करण्यात आले होते. या कामाची निविदा २८ लाख रुपयांची होती. मात्र, तरतूद संपल्याने काम बंद झाल्याचे त्यांनी सांगितले. यावर मनोज कोतकर आणि सुरेश बनसोडे यांनी काम अर्धवट राहिल्यामुळे पावसाच्या काळात नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा सवाल उपस्थित केला. संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली.

मनोज कोतकर यांनी शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त का होत नाही, असा सवाल उपस्थित केला. संबंधित संस्थेला बिले देण्यात आलेली नसल्याने त्यांनी काम बंद केले असल्याचे सांगत पैठणकर यांनी या विषयावर माहिती द्यावी, अशी मागणी केली. मात्र, पैठणकर सभेला उपस्थित नसल्याने मनोज कोतकर यांनी नाराजी व्यक्त केली. ‘नगरसेवकांचा अंत पाहू नका, आमची चेष्टा करू नका,’ अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली. नवनाथ कातोरे यांनीही नगरसेवकांना किंमत दिली जात नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. ‘निवडणूक घेताच कशाला?’ असा सवाल त्यांनी केला. बाबासाहेब वाकळे यांनी संबंधित अधिकारीच सभेला उपस्थित नसताना चर्चा कशी करणार, असा सवाल केला. त्यावर सभापती पै. सुभाष लोंढे यांनी पैठणकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश दिले.

### सभापतींनी प्रशासनाला दिले ’हे’ आदेश

३३ रस्त्यांसाठी परिपूर्ण प्रकल्प अहवाल तयार करा. रस्त्यांच्या अहवालात पाणी लाईन, विद्युत खांब–तारा आणि अतिक्रमणांची माहिती समाविष्ट करा. रस्ता कामांना वेळेचे बंधन घालून कामे वेळेत पूर्ण करा. गणेश विसर्जन मार्गाचे योग्य नियोजन करून नागरिकांना माहिती द्या. कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती करा. नेप्ती नाका येथील बारवेची स्वच्छता करा. सभेला गैरहजर राहणाऱ्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस द्या. कचरा डेपोतील कचऱ्याची क्षमता, आवक आणि प्रक्रिया याची सविस्तर माहिती द्या. केडगावातील प्रलंबित नालेसफाईचे काम तातडीने पूर्ण करा. नगरसेवकांना विश्वासात घेऊन जनजागृतीची कामे करा. नगरसेवकांचा मान–सन्मान राखून त्यांच्या कामांना प्राधान्य द्या.

# गृहिणी

## आरोग्य

### लहान मुलांचे वजन वाढविण्यासाठी काय करावे?

अनेक आई वडिलांची हीच तक्रार असते की मूल काही खातच नाही आणि खाल्ले तरी अंगी लागत नाही. यासाठी फक्त जास्त खायला घालणे हा उपाय नाही तर काय खायला घालतो आणि कसे खायला घालतो हे खूप महत्त्वाचे आहे. सकाळची सुरुवात चांगली झाली तर दिवसभर भूक चांगली लागते. सकाळी उठल्यावर रात्री भिजत घातलेले दोन बदाम, दोन मनुका आणि एक अंजीर बारीक करून द्यावे. त्यानंतर न्याहारीमध्ये बाहेरचे पदार्थ न देता घरचे पदार्थ द्यावेत. नाचणीचे सत्व, गव्हाची खीर, तांदळाची पेज, शेंगदाणा गूळ पोळी, साजूक तुपात भाजलेला शिरा असे पदार्थ मुलांना आवडतातही आणि वजनही वाढवतात. अनेकजण मुलांना फक्त भात देतात पण भातासोबत वरण, तूप, दही आणि हिरवी भाजी असेल तरच त्यातून पूर्ण ताकद मिळते दुपारच्या जेवणानंतर लगेच झोपू देऊ नये. थोडा वेळ खेळू द्यावे. संध्याकाळी भूक लागते तेव्हा तळलेले पदार्थ, गोडी असलेले पाणी, बाहेरची चॉकलेटे देण्यापेक्षा घरी भाजलेले मखाने, भाजलेले शेंगदाणे, फुटाणे, केळी, पपई, चिकू, आंबा अशी फळे द्यावीत. केळी आणि दूध एकत्र करून दिले तर वजन लवकर वाढते. रात्रीच्या जेवणात हलका आहार द्यावा, जसे की खिचडी तूप लावून, पोळी भाजी आणि शेवटी एक वाटी दूध. झोपण्यापूर्वी कोमट दुधात थोडी हळद, खडीसाखर घालून दिले तर झोपही शांत लागते आणि पचनही सुधारते.वजन न वाढण्यामागे पोटात जंत असणे, सारखी सर्दी होणे, झोप पूर्ण न होणे ही कारणे असू शकतात. म्हणून सहा महिन्यातून एकदा जंताचे औषध वैद्याच्या सल्ल्याने द्यावे, मुलाला रोज उन्हात थोडा वेळ खेळू द्यावे जेणेकरून शरीराला नैसर्गिक सत्व मिळेल. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जेवताना रागावू नये, दूरचित्रवाणी दाखवून भरवू नये, तर गोष्ट सांगत प्रेमाने भरवावे. प्रेमाने खाल्लेले दोन घास सुद्धा बाजारातील महागड्या औषधापेक्षा जास्त गुण देतात. जर तीन महिने हे सर्व करूनही वजन वाढले नाही, मूल सारखे आजारी पडत असेल तर मात्र सरकारी दवाखान्यात जाऊन तपासणी जरूर करून घ्यावी.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### काजू कतली मोदक

**साहित्य :** काजू २५० ग्रॅम, साखर १०० ग्रॅम, पाणी १/४ वाटी, साजूक तूप १ चमचा, वेलची पूड १/४ चमचा, पिस्त्याचे काप १ चमचा सजावटीसाठी

**कृती :** काजू २ तास कोमट पाण्यात भिजत घाला. नंतर पाणी काढून मिक्सरमध्ये अगदी बारीक वाटून घ्या, गरज लागल्यास १ चमचा दूध घाला. कढईत साखर आणि पाणी घालून एकतारी पाक करा. पाक झाला की त्यात वाटलेले काजूचे मिश्रण घाला. मंद आचेवर सतत ढवळत राहा. मिश्रण घट्ट होत आले की त्यात साजूक तूप आणि वेलची पूड घालून एकजीव करा. मिश्रण कढई सोडू लागले की गॅस बंद करा. मिश्रण थोडे कोमट झाल्यावर हाताला तूप लावून चांगले मळून घ्या. या गोळ्याचे छोटे गोळे करून मोदकाच्या साच्यात घालून मोदकाचा आकार द्या. वरून पिस्त्याचे काप लावा. तयार मोदक १ तास हवेत ठेवा म्हणजे कतलीसारखे होतील.

## वास्तू

### बोअरवेल संबंधी...

* बोअरवेल नेहमी विहिरीपासून लांब घ्यावा. विहिरीच्या जवळ बोअरवेल घेतल्यास विहिरीचे पाणी बोअरवेल ओढून घेते.

* शेताच्या बरोबर मध्ये कधीही विहीर खोदू नये. त्यामुळे शेतीचे दोन तुकडे होतात आणि बैलगाडी, ट्रॅक्टर फिरवायला त्रास होतो.

## सौंदर्य

उन्हाळ्यात कांदा, लसूण, जास्त तिखट आणि तेलकट खाणे कमी करा, याने घामाला जास्त वास येतो.

## सल्ला

पोळी तव्यावर टाकल्यावरच पीठ मळू नका. आधी सगळे पीठ मळून, भाज्या चिरून मगच गॅस चालू करा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

**बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६**

**वामन जयंती, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, श्रवण ०९।०९, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज धनलाभ होण्याची शक्यता आहे. घरात आनंदाचे वातावरण राहील.

**वृषभ :** आज कामात अडथळे येतील. मन थोडे अस्वस्थ राहील. मागील उधारी वसुल होईल.

**मिथुन :** आज नवीन ओळखी होतील. प्रवासातून लाभ मिळेल.

**कर्क :** आज कुटुंबात मतभेद होण्याची शक्यता आहे. खर्च वाढेल.

**सिंह :** आज मान सन्मान वाढेल. मोठ्या व्यक्तीची भेट होईल.

**कन्या :** आज आरोग्यात सुधारणा होईल. जुनी देणी वसूल होतील.

**तूळ :** आज जोडीदाराशी मतभेद होतील. कामाचा ताण वाढेल.

**वृश्चिक :** आज अचानक धनलाभ होईल. शत्रूवर विजय मिळेल. जुन्या मित्रांची भेट होईल.

**धनु :** आज नोकरीत बदलाची शक्यता आहे. दूरचा प्रवास घडेल.

**मकर :** आज जमिनीच्या कामात लाभ होईल. मित्रांची मदत मिळेल.

**कुंभ :** आज मुलांकडून चांगली बातमी मिळेल. दिवस आनंदात जाईल.

**मीन :** आज तब्येतीत बिघाड होईल. पैशाची चणचण भासेल.

## शब्दगंध क्र. ७५२२

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | | ६ |
| ७ | | | | ■ | | ■ | |
| | ■ | ८ | | ९ | | | |
| ■ | १० | | | | ■ | ■ | ■ |
| ११ | | ■ | ■ | ■ | १२ | १३ | १४ |
| १५ | | ■ | १६ | १७ | | | |
| १८ | | १९ | ■ | २० | | | ■ |
| ■ | २१ | | | | ■ | २२ | |

**आडवे शब्द :-** १) चांगल्या घराण्यातील; उच्च कुलीन ५) दबाव; पत; जडपणा ७) बागकाम करणारा; माळी; फुलधर; बनकर ९) खाल्लेल्या मिठाला न जागणारा; अमिताभ बच्चन, राजेश खन्ना यांचा एक हिंदी चित्रपट १०) पलीकडची बाजू पैलतीर ११) झाडाखालचा ओटा; पैलतीर १२) एक वनस्पती जिची पाने दसऱ्याला सोने म्हणून एकमेकांना देऊन शुभेच्छा दिल्या जातात १५) गव्हाचे कणीदार पीठ १६) पाल वर्गातील एक जीव जो सापासारखाही दिसतो १८) कमतरता; उणीव; कसर २०) थंडपणा; शीतलता २१) गीत रचणारा किंवा लिहिणारा २२) एक विषारी साप

**उभे शब्द :-** १) आयते व अचानक मिळालेले धन २) वर्ण; मौज; कलर; रंगविण्याचे साधन ३) जंगलाला लागलेली आग; वणवा ४) लोकांचे मत ५) विष्णूचा तिसरा अवतार ६) मऊ; मृदू; मवाळ ९) बाजू; शेवट; पक्ष १०) स्वातंत्र्य; मुभा ११) एक पक्षी; जंगली कबूतर १२) देवांचे शत्रू; राक्षस; दानव १३) परवानगीचे पत्र १४) दोन्ही तळहात एकमेकांवर आपटून केला जाणारा आवाज १७) वेतन; पेमेंट १९) वारा; हवा; वायू

### शब्दगंध क्र. ७५२१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मं | ग | ळ | वा | र | ■ | अ | स्त |
| दो | र | ■ | ■ | पे | ह | रा | व |
| द | म | द | मा | ट | ■ | ज | न |
| री | ■ | ग | न | ■ | ब | क | ■ |
| ■ | सा | ड | पा | त | ळ | ■ | मा |
| मा | र | ■ | न | ■ | ज | न | ता |
| फ | ण | स | ■ | श | ब | न | म |
| क | ■ | बा | र | क | री | ■ | ह |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** वेळ आणि संधी कधीच परत येत नाहीत, म्हणून त्यांचा आदर करा.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सर्जिकल स्ट्राईक म्हणजे नेमके काय? ती फक्त हवाई हल्ल्याद्वारेच केली जाते का?

आपण लहानपणी डॉक्टरांकडे गेलो असू तर पाहिले असेल की डॉक्टर कधी कधी शस्त्रक्रिया करतात. समजा हाताला छोटा फोड आला असेल तर डॉक्टर पूर्ण हात कापून टाकत नाहीत. ते फक्त जिथे फोड आहे तिथेच औषध लावतात किंवा छोटीशी सुई टोचून तो फोड बरा करतात आणि बाकीच्या चांगल्या शरीराला काहीही होऊ देत नाहीत. अगदी तसेच सैन्यदलात देखील असते आणि त्यालाच सर्जिकल स्ट्राईक असे म्हणतात.

आपल्या शेजारील देशात काही ठिकाणी वाईट लोक लपून बसलेले असतात, त्यांना दहशतवादी म्हणतात. ते नेहमी भारतात येऊन वाईट कृत्य करण्याचा विचार करतात. त्यांचे तळ हे जंगलात किंवा डोंगरात लपलेले असतात. भारताला राग त्या वाईट लोकांचा असतो, त्या देशात राहणाऱ्या सामान्य मुलांचा, आई-वडिलांचा, शाळेचा किंवा शेतकऱ्यांचा नसतो. म्हणून भारत कधीच असा विचार करत नाही की संपूर्ण देशावरच बॉम्ब टाकावा. भारत विचार करतो की आपण फक्त त्या वाईट लोकांचे ठिकाण शोधून काढू आणि फक्त त्यांनाच शिक्षा देऊ जेणेकरून सामान्य नागरिकांना काहीही त्रास होणार नाही. याच हुशार आणि अचूक हल्ल्याला सर्जिकल स्ट्राईक असे म्हणतात.

आता अनेकांना वाटते की हा हल्ला फक्त विमानातूनच होतो का, तर तसे नाही. हे अभियान डॉक्टर जसे वेगवेगळ्या पद्धतीने उपचार करतात तसेच तीन प्रकारे होते. पहिला प्रकार म्हणजे जमिनीवरून. आपले सर्वात शूर कमांडो जवान रात्रीच्या वेळी काळे कपडे परिधान करून, हळू हळू सरपटत शत्रूच्या हद्दीत जातात. ते कोणालाही आवाज येऊ देत नाहीत, काट्याकुट्यातून वाट काढतात आणि बरोबर तळ सापडला की तो उद्ध्वस्त करतात आणि पहाट होण्यापूर्वी परत आपल्या देशात येतात. २०१६ साली अशाच प्रकारचा सर्जिकल स्ट्राईक करण्यात आला होता.

दुसरा प्रकार म्हणजे हवेतून. कधी कधी तो तळ खूप आत असतो तिथे पायी जाणे शक्य नसते, मग आपल्या हवाई दलाची विमाने गरुड पक्षी आकाशातून झेप घेतो तशी अत्यंत वेगाने जातात, बरोबर त्या तळावर लक्ष्य साधतात आणि परत येतात. २०१९ साली बालाकोट येथे असेच करण्यात आले होते. आणि तिसरा प्रकार म्हणजे लांबून केलेला वार. आता तर आपल्याकडे अशी क्षेपणास्त्रे आहेत जी शेकडो किलोमीटर लांबून सुद्धा अगदी टाचणीच्या टोकाएवढ्या अचूक जागेवर जाऊन पडतात. जवानाला तिथे जाण्याची आवश्यकता नसते. २०२५ च्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने याच प्रकारचा वापर केला आणि एकाच रात्री नऊ ठिकाणचे तळ नष्ट केले.

म्हणूनच सर्जिकल स्ट्राईक म्हणजे रागाच्या भरात केलेली मारामारी नाही, तर ती अत्यंत शांत डोक्याने, हुशारीने आणि फक्त वाईटाचा नाश करण्यासाठी केलेली एक शस्त्रक्रिया असते.

### चिमणीची जिज्ञासा

एका झाडावर एक चिमणी आणि कावळा राहत होते. चिमणी रोज सकाळी उठून शेतात जायची, नवीन बिया शोधायची, लोकांची घरे पाहायची, तिला सगळे कसे बनते याची जिज्ञासा होती. कावळा मात्र झाडावरच बसून म्हणायचा, कशाला उगाच फिरतेस? जे मिळेल ते खा आणि झोप.

एक दिवस गावात मोठी जत्रा भरली. चिमणीने पाहिले, माणसे एका मोठ्या लोखंडी पेटीतून गाणी लावत आहेत. तिला जिज्ञासा वाटली, हा आवाज कुठून येतो? ती हळूच जवळ गेली आणि पाहिले, त्या पेटीला एक बटण आहे, बटण दाबले की गाणे वाजते.

त्याच रात्री जंगलात कोल्हा आला. सगळे पक्षी घाबरले. तेव्हा चिमणीने युक्ती केली. ती जत्रेतल्या त्या गाण्याच्या पेटीजवळ गेली आणि मोठ्याने बटण दाबले. मोठा आवाज आला, कोल्हा घाबरून पळून गेला. सगळ्या पक्ष्यांचे प्राण वाचले.

कावळा लाजला तो म्हणाला, तुझ्या जिज्ञासे मुळेच आज आपण वाचलो.

तात्पर्य : जिज्ञासू वृत्ती माणसाला नेहमी नवीन ज्ञान देते आणि हेच ज्ञान अडचणीच्या वेळी उपयोगी पडते.

## आत्मशक्ति



### क्रोधावर नियंत्रण

तेजस्वी आत्मा मलिन होत जातो. क्रोध आणि हिंसा आत्म्यावर आवरणे कशी टाकतात ? प्रत्यक्षात आत्मा अहिंसक आहे. क्रोध त्यांच्या दृष्टीने परदेशी आहे. आई व तिच्या बाळाचे उदाहरण घेऊ या. आईच्या हृदयात बाळाबद्दल इतके प्रेम असते की तिच्या मनात क्रोधाला जागाच नसते. बाळ आईचे केस ओढो, तिला मारो अथवा तिचे कपडे घाणीने भरो. आईचे बाळावर इतके प्रेम असते की हे सारे ती सहज सहन करते. बाळाशी तिच्या मनात दयाच असते. जागृत आत्मा चेतन अवस्थेत कसा काम करतो हे ह्या उदाहरणावरून स्पष्ट होते.शांत व समाधानी राहून आत्मा ह्या जगाचे खेळ पहात असतो. तो परमात्म्याला जोडलेला असतो. त्यामुळे क्रोध आणि हिंसा त्याच्या चैतन्याचे भाग नसतात. अफ्रीकेमध्ये एक म्हण वापरात आहे. 'जो कोणी दुसऱ्याचे वाईट करतो, तो परमेश्वराला विसरतो.' केवळ मनाच्या संगतीने आत्मा हिंसा व क्रोधाला ओळखतो. पण त्यांच्याकडे तो ओढला जात नाही. जसे येणाऱ्या जाणाऱ्या ढगांमुळे सूर्यावर परिणाम होत नाही पण सूर्यकिरण मात्र अडविले जातात. तो तर आपली जीवनदायी किरणे पसरवित असतो. हे ढग निघून जातील हे त्यास माहित असते. आत्मा शांती आणि अहिंसेचे किरणे पसरवित जातो. आमच्या जीवन काळात आम्ही आत्मा जागृत केला तर आत्मा हिंसेच्या व कठीण प्रसंगात शांतपणे समजूतदार राहील आणि कोणत्याही अडथळ्यांना झुगारून आपली (शांती आणि प्रेमाची) किरणे पसरवीत राहील.मग प्रश्न असा पडतो की आत्मा जर अहिंसक आहे तर जगात हिंसा का ? आत्म्याच्या प्रेमाला साद घालण्याऐवजी जर आपण मनाच्या इच्छांकडे लक्ष दिले तर हिंसा घडते. मन स्वतःच्या इच्छापूर्तीच्या मागे लागलेले असते. तसे घडले नाही तर मन क्रोधिष्ठ होते. मग त्याच्या आड जो येईल त्याच्यावर ते अगदी तुटून पडते. मनाला काय हवे असते ? काही माणसे धनदौलत, ऐश्वर्य, बंगला-गाड्या आणि किंमती दागिन्यांची इच्छा करतात. काही जणांना मानपानाची, नावलौकिकाची व सत्तेची ओढ असते. ह्या जगात असंख्य इच्छा आहेत व क्रोध अनेक प्रकारे प्रगट होत असतो. आम्ही मनातल्या मनात संताप असतो. असेही घडते की इतरांना न समजता आम्ही आतल्या आत क्रोधाने धुसमत असतो. तेव्हा काहीही जरी बोलले नाही तरी (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### अध्यात्मिकता

असं म्हणताना आपण विसरतो की, मुळात ते वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेले दोन आत्मे आहेत. गतजन्मात कदाचित त्या आत्म्याने खूप दुःखदायक घटना किंवा विश्वासघात अनुभवला असेल. समजा, पूर किंवा तत्सम नैसर्गिक आपत्ती आली असेल त्यामुळे कुटुंब विखुरलं असेल आणि त्यातल्या एकाने देह सोडला असेल. आयुष्याच्या शेवटच्या काळात त्या आत्म्याने स्वतःचं कुटुंब, यश, मालमत्ता, इ. सगळं गमावताना बघितलं असेल. अशा प्रकारे आत्म्याची शेवटची अवस्था वेदना, नुकसान आणि भीतीची होती. आता त्या आत्म्याने दुसऱ्या कुटुंबात नव्याने जन्म घेतला. वर्तमान आयुष्यात, भीती हा त्या बाळाचा मुख्य संस्कार असेल कारण तो संस्कार ते बाळ घेऊन आलं आहे. तो आत्मा आईवडिलांना घट्ट धरून राहील, कोणीतरी सोडून जाईल अशी भीती त्याला वाटेल. त्याला अंधारात बाहेर जायची भीती वाटेल. त्याला कदाचित पाण्याची भीतीही वाटेल आणि आपलं मूल इतकं भित्रं कसं याचं पालकांना आश्चर्य वाटेल.'

सुरेश ओबेरॉय : ते कदाचित विनोदही करतील, हे आपलं बाळ नाहीये, हॉस्पिटलमध्ये चुकून दुसऱ्या कोणाच्यातरी बाळाबरोबर अदलाबदल झाली असेल.

शिवानीदीदी : याचं कारण पालकांना त्यांच्या आणि बाळाच्या संस्कारांमधला फरक दिसत असेल. ते जर अशीच टीका, थट्टा करत राहिले तर भीतीचे आणि वेदनेचे हे संस्कार अजून खोलवर रुजतील. पण जर पालक अध्यात्माविषयी जागरूक असतील तर त्यांचं बाळ म्हणजे एक आत्मा आहे ज्याचा भूतकाळ आपल्याला माहीत नाही हे ते समजून घेतील. मी एकदा एका आईला भेटले होते. तिने मला सांगितलं की, तिचा मुलगा खूपच हुशार आहे. तो अनेक भाषा शिकला आहे. त्याची बौद्धिक क्षमता खूप उच्च आहे आणि तो गोष्टी खूप पटकन शिकतो. मग ती म्हणाली की हे कसं शक्य आहे ? कुटुंबातील इतर कोणीही इतकं हुशार नाही. मी तिला सांगितलं की आत्मा त्याचे पूर्वीचे संस्कार घेऊन आला आहे. पण मुलाच्या बाबतीत तिला एक अडचण होती. तो मुलगा पाण्याला खूप घाबरायचा आणि एखाद्या पोहण्याच्या तलावाच्या किंवा पाण्याच्या आसपासही जायचा टाळाटाळ करायचा.

एक दिवस, पोहण्याच्या तलावाच्या जवळ जायला त्याने नकार दिला तेव्हा ती त्याच्यावर जरा जास्तच चिडली.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**बंड्या :** गुरुजी, मी नेहमीच आरशात पाहतो तेव्हा मला गाढव का दिसते?

**गुरुजी :** कारण आरसा कधीही खोटं बोलत नाही रे बंड्या!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्रात पंचायत राज ची सुरुवात कधी झाली?

– १९६२ साली

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### संतती प्रतिबंधक उपाय

'वैद्य, माझ्या लग्नाला फक्त तीनच आठवडे झाले व तुम्ही तर मला सव्वा महिन्यांची गर्भधारणा आहे, असे सांगितले. हे जर माझ्या घरच्यांना समजले, तर त्यांना वेगळाच संशय येईल. काहीही करा पण मला हे बाळ नको'. प्रणालीचे हे बोलणे ऐकल्यानंतर मी तिला सांगितले, शांत हो, तुझ्या घरच्यांना माझ्याकडे घेऊन ये. मी त्यांना समजावून सांगते. ही समस्या फक्त प्रणालीच्याच बाबतीत घडते असे नाही, तर वैद्यकीय सेवा करताना बऱ्याच रुग्णांच्या बाबतीत ही समस्या घडते. अशा वेळी घरातील इतर सदस्यांना समजावून सांगणे कठीण जाते. गर्भाचे वय काढताना त्याचे माप पाळीच्या पहिल्या दिवसापासून धरले जाते.

पाळीच्या पहिल्या दिवसापासून गर्भाशयामध्ये बीज निर्मितीसाठी तयारी होत असते. पाळीच्या १२-१८ व्या दिवसापर्यंत शारीरिक संबंध आल्यावर योनीमार्गातून शुक्रजंतू बीजवाहक नलिकेत जातात आणि त्यांचा परिपक्व स्त्रीबीजाशी संयोग होऊन गर्भधारणा होते. प्रणालीच्या बाबतीत नेमके हेच घडले. पाळीच्या १५ व्या दिवशी लग्न होऊन, त्यानंतर लगेचच शारीरिक संबंध झाला व गर्भधारणा राहिली. स्त्रीबीजकोशामध्ये बीजाची १४ दिवसांपर्यंत नैसर्गिकपणे वाढ होत होती व बीजाची चांगली वाढ झाल्यावर ते फुटले व लग्नानंतर लगेचच संबंध आल्यामुळे तिला गर्भधारणा झाली.

प्रसूतीची तारीख काढताना पाळीच्या पहिल्या दिवसापासून नऊ महिने सात दिवस अशी तारीख अंदाजे निघते. हे घरच्यांना मी समजावून सांगितले व त्यामुळे गर्भपात होण्याचे टळले; परंतु सर्वांच्याच बाबतीत असे होत नाही. काहीजण पत्नीवर, सुनेवर संशय घेतात व गर्भपात करतात; म्हणून संततिप्रतिबंधक उपाय माहिती असणे फार गरजेचे असते. गर्भधारणा अचानक न होता नियोजनपूर्वक संततिप्रतिबंधक उपाय वापरून होऊ द्यावी. काही नवविवाहितांचे शिक्षण अपूर्ण असते. काहींना नोकरी, व्यवसाय करायचा असतो, तर काही नवविवाहितांची बाळाच्या संगोपनाची मानसिक तयारी नसते. त्याच प्रमाणे दोन बाळांमध्ये अंतर ठेवण्यासाठीसुद्धा तात्पुरत्या संततिप्रतिबंधक उपायांचा वापर करावा.

स्त्रियांनी वापरावयाची साधने :

१) गर्भनिरोधक गोळ्या : या गोळ्या पाळीच्या ५ व्या दिवशी सुरू करायात. एकदा गोळी सुरू केली की ती मध्येच बंद करू नये. मध्येच बंद केल्यास लगेचच पाळी येते. नियमितपणे रोज रात्री एक गोळी घ्यावी.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा येथे गुरुद्वारा परिसरात भाविकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या सभामंडपाचे लोकार्पण सौ. धनश्री विखे यांच्या हस्ते करण्यात आले.

# तारकपूरच्या अमृतवेला गुरुद्वारात बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरब सोहळा उत्साहात

**धनश्री सुजय विखे यांच्या हस्ते सभामंडपाचे लोकार्पण; समाजसेवकांचा विशेष सत्कार**

नगर – तारकपूर येथील अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा येथे बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरब सोहळा विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी उत्साहात पार पडला. दोन दिवसीय या सोहळ्यात आरती, गुरबाणी कीर्तन, शब्द, आनंद, अरदास, हुकमनामा तसेच गुरू का लंगर आदी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास समाजबांधव, महिला वर्ग आणि भाविकांनी उपस्थिती लावली.

गुरुपुरब सोहळ्याच्या निमित्ताने गुरुद्वारा परिसरात भाविकांच्या सोयीसाठी सुजय राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या सभामंडपाचे लोकार्पण २१ सप्टेंबर रोजी सौ. धनश्री सुजय विखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संग्राम जगताप, अमोल गाडे, सुप्रिया धनंजय जाधव, अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वाराच्या नवनिर्वाचित अध्यक्षा वीराजी वाही, उपाध्यक्ष राजेंद्र कंत्रोड, जनक आहुजा, सतीश गंभीर, अमित थापर, जगजितसिंह गंभीर, हरजितसिंह वधवा, किशोर कंत्रोड, बलराम सचदेव, प्रदीप पंजाबी, कन्हैया बालानी, निप्पू धुप्पड, जय भोसले, बबलू खोसला, चिंटू गंभीर, सावन छाब्रा, रामसिंह कथुरिया, रेखा गुलाटी, पूनम खुल्लर, राजू जग्गी, रेखा पावा, अवतार गुरली, निशा हरद्वानी, नगरसेवक महेश लोंढे, नगरसेविका हरप्रीतकौर गंभीर, नगरसेवक मोहित पंजाबी, केवल मल्होत्रा, रविंदर नरंग, राजेंद्र चावला, सतिंदर नारंग, पियुष जग्गी, संजू आहुजा, गिरीश खन्ना आदी उपस्थित होते.

बाबा श्रीचंद महाराज हे श्री गुरु नानक देवजी यांचे ज्येष्ठ सुपुत्र असून, उदासी परंपरेचे संस्थापक म्हणून त्यांचे स्मरण केले जाते. उपलब्ध ऐतिहासिक स्रोतांनुसार त्यांचा जन्म ८ सप्टेंबर १४९४ रोजी सुलतानपूर लोधी येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्म, योग, साधना आणि वैराग्याची ओढ होती. पुढे त्यांनी उदासी परंपरेच्या माध्यमातून आध्यात्मिक विचारांचा प्रसार केला. बाबा श्रीचंद महाराजांनी विविध प्रदेशांत भ्रमण करून अध्यात्म, ज्ञान, साधना आणि मानवकल्याणाचा संदेश दिल्याची परंपरा आहे. त्यांच्या परंपरेशी संबंधित अनेक डेरे, आश्रम, गुरुद्वारे आणि धार्मिक केंद्रे पुढे देशाच्या विविध भागांत निर्माण झाली. त्यांच्या जीवनाशी संबंधित बारठ साहिबसह अनेक स्थळांना आजही धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. अहिल्यानगरमधील अमृतवेला बाबा श्रीचंद महाराज गुरुद्वारा हा या आध्यात्मिक परंपरेचा वारसा जपणारे श्रद्धास्थान म्हणून ओळखला जातो.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, पुढील पिढी चांगली घडण्यासाठी आणि चांगले विचार पेरण्यासाठी धार्मिक स्थळे प्रेरणास्थळे ठरत आहेत. समाजाने पुढे जाताना आपला इतिहास विसरता कामा नये. शीख आणि पंजाबी समाज हा भारत–पाकिस्तान फाळणीनंतर भारतामध्ये येऊन मोठ्या हिमतीने उभा राहिला. तसेच हा समाज हिंदू संस्कृतीशी एकरूप झाला. आजची पिढी सोशल मीडियामध्ये गुंतलेली आहे. त्यामुळे या पिढीला आपला इतिहास सांगण्याची गरज आहे. धर्मासाठी गुरु गोबिंद सिंह यांच्या सुपुत्रांनी बलिदान दिले. हाच विचार आणि वारसा पुढे घेऊन जायचा असल्याचे आमदार त्यांनी सांगितले.

धनश्री विखे यांनी बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरब सोहळ्यानिमित्त उपस्थित भाविकांना शुभेच्छा दिल्या.

समाजसेवा आणि सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मन्नू खुबचंदानी, रामसिंह कथुरिया, बलराम सचदेव आणि लखू मतलई यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. तसेच गुरुद्वाराच्या वतीने उपस्थित पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी नगरसेवकांचाही सन्मान करण्यात आला.

बाबा श्रीचंद महाराजजी यांची आरती करण्यात आली. आरतीनंतर शब्द, आनंद साहेब, अरदास, हुकमनामा आणि गुरू का लंगर या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. बाबा श्रीचंद महाराज गुरुपुरब सोहळा साजरा करण्यात आला. सकाळी हजुरी रागी जथा भाई दयासिंहजी यांच्या गुरबाणी कीर्तनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर शब्द, आनंद साहेब, अरदास, हुकमनामा आणि गुरू का लंगराने सोहळ्याची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरजितसिंह वधवा आणि आभार प्रदर्शन सतीश गंभीर यांनी केले. सोहळ्यास समाजबांधव आणि महिला उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## भावनांच्या आहारी जावू नये

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स




पूजापाठ आटोपले. स्वामी विवेकानंद ध्यानाला बसले. तेवढ्यात एक शिष्यवर धावत आले. दिसतच होते संतापलेले. येताच येताच कडाडले, व्योमानंद मला बोलले. मी नवा असले आश्रमात आलेलो, म्हणून काय मला तुच्छ लेखायचं? त्यांना समज द्या.

स्वामी ध्यानस्थ. तो शिष्य आता अस्वस्थ. केवढं उकडतंय? बाहेर मोकळं वाटतंय. इथे आत गुदमरतोय. या खोलीला ना खिडकी, ना झरोका. घामाने भिजलो.

स्वामी स्तब्ध.

तो शिष्य आता उठला. शेजारच्या खोलीत गेला. खिडकीतून पलीकडे डोकावला. पुन्हा परतला. काय ही कटकट? बाई स्वयंपाक करते आहे की चेष्टा? फोडणीतला लसूण जळाला. घाण वास सुटला. मला तर मळमळायला लागलंय. स्वामी, या शेजाऱ्यांना समज द्या.

स्वामी विवेकानंदानी डोळे उघडले. शिष्याला म्हणाले, तुझी व्योमानंदाबद्दल तक्रार आहे. तुला खूप राग आलाय. तेव्हा व्योमानंदांना मी सजम द्यावी, असंच ना?

शिष्यवर म्हणाला, आधी त्या शेजाऱ्यांना समज द्या. लसूण जाळतात. घाणेरडा वास इतरांच्या नाकात भरवतात.

स्वामी म्हणाले, म्हणजे व्योमानंदांना समज द्यायला नको ? शिष्य खालच्या स्वरात म्हणाला, नाही. मघा मी खूपच रागावलो होतो. म्हणून तसं म्हणत होतो. आता लक्षात आलं, की व्योमानंदांच काय चुकलं ? आश्रमाच्या नियमाप्रमाणे मी पहाटेच उठायचं. नाही उठलो. मी चुकायचं आणि मीच रागवायचं? ते बरोबर म्हणाले, की झोपच आवडते, तर संन्याशी व्हायचं नव्हतं.

स्वामीजी हसले, हा पंखा घे, म्हणाले.

शिष्य ओळखला, म्हणाला पंखा नको, मघा धावत आत आलो म्हणून घामानं वैतागलो. आता ना गरमी ना घाम. आता वाटतो आराम. ना ?

स्वामीजी पुन्हा हसले. मग या बंद खोलीला खिडक्याही पाडायला नकोत. शिष्याने खाली मान घातली.

स्वामी लगेच म्हणाले, ठीक. त्या शेजाऱ्यांना मात्र समज द्यायलाच हवी. नाही का? तुला जळलेल्या लसणाच्या फोडणीने मळमळतयं ना? शिष्याने नजर वर केली नाही. नुसती मान नकारार्थी हलवली. ओठातल्या ओठात पुटपुट केली. शेजारी काय आजच राहायला आलेत ? तुम्हाला कधी जळलेल्या लसणाच्या वासानं मळमळलं? मीच शेजाऱ्याच्या घरात डोकावून पाहायला नको होतं.

स्वामीजींनी पुन्हा हसून शिष्याकडं पाहिलं. तो गुपचूप तेथून निघून गेला.

खरेच, एकदम भावनांच्या आहारी जाऊ नये, नाही? एकदम तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करू नये. वेळ जाऊ द्यावा. मग राग शमतो. गुदमरणे थांबते. मळमळणे तर आठवतही नाही. विवेक जागा होतो. चूक आपलीच हे आपण समजून घेतो. उगाच दुसऱ्याच्या संसारात आपण नाक खुपसू नये. हे नीट ओळखतो.

भगवद्‌गीता सांगते, मी कुणीतरी आहे. मला हा हटकतो? मग मला लगेच राग येतो. अंगात रग असते ना? ती तुच्छ मानते जग. मला होऊ नये कुठलाही त्रास, हाच एक ध्यास. मग त्यापायी होतो माणूस एकदम उत्तेजित. हे सोडावे. रागाला आवरावे. काही काळ तरी शांत राहावे. मग आपोआप विवेक जागा होतो. राग तर केव्हाच शमतो. माणूस सुख, समाधान मिळवतो.

– किशोर गांधी



बुऱ्हाणनगर येथील गणेश दुधाले यांच्या निवासस्थानी सोन पावलांनी आलेल्या सौभाग्य लक्ष्मींची विधीवत प्रतिष्ठापना करून पूजा करण्यात आली. लक्ष्मींसमोर सुंदर सजावट आणि आरास करण्यात आली.

# 'काळी आई मुक्ती आंदोलना'चा एल्गार; २३ सप्टेंबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

नगर – स्वातंत्र्याला जवळपास आठ दशके पूर्ण होत आली असतानाही देशातील आर्थिक व सामाजिक विषमता अपेक्षित प्रमाणात कमी झालेली नाही. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेचे केंद्रीकरण कायम असल्याने वननिवासी शेतकरी व त्यांच्या कुटुंबांना विविध प्रकारच्या अन्यायाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर वननिवासी शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी २३ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने 'काळी आई मुक्ती आंदोलन' करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

वननिवासी शेतकरी हे पिढ्यान्‌पिढ्या जमिनीशी आणि निसर्गाशी जोडलेले असूनही त्यांना त्यांच्या हक्कांबाबत पुरेशी कायदेशीर माहिती, शिक्षण आणि संघटित शक्ती उपलब्ध झाली नाही. त्यांच्या या असहायतेचा गैरफायदा घेतला गेला. परिणामी अनेक कुटुंबांना अन्याय, असुरक्षितता आणि उपजीविकेच्या प्रश्नांना सामोरे जावे लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

यापुढे वननिवासी शेतकऱ्यांवरील अन्याय एक दिवसही सहन केला जाणार नाही, असा निर्धार पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी व्यक्त केला आहे. वननिवासी शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी हे आंदोलन उभारण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ॲड. गवळी म्हणाले की, काळी आईशी प्रामाणिक नाते जपणाऱ्या वननिवासी शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे. त्यांचा सन्मान, अधिकार आणि उपजीविका सुरक्षित करणे हे शासनाचे घटनात्मक कर्तव्य आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून वननिवासी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या आंदोलनाच्या माध्यमातून वननिवासी शेतकरी व त्यांच्या कुटुंबांच्या हक्कांकडे शासनाचे लक्ष वेधण्याबरोबरच त्यांच्या प्रश्नांवर ठोस कार्यवाही करण्याची मागणी केली जाणार आहे. शासनाने या कुटुंबांच्या समस्या गांभीर्याने घेऊन त्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली आहे.

दरम्यान, आंदोलनाची पूर्वकल्पना म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, महसूल मंत्री तसेच जिल्हाधिकारी यांना निवेदन पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या आंदोलनासाठी सयाजी गायकवाड, आसाराम सातपुते, जगन्नाथ गुंजाळ, हिरामण गायकवाड, आसाराम बर्डे, बारीकराव गायकवाड आदी प्रयत्नशील आहेत.



नालेगाव येथील श्री साईबाबा मंदिर येथे आकर्षक रोषनाई व सजावट करण्यात आली आहे.

# काशीचा 'निकुंभ गणेश' ! राजा दिवोदासाने का पाडले त्याचे मंदिर? – हरिवंश आणि पुराणांतील एक गूढ कथा



आपल्या प्राचीन वाङ्मयात अशाही काही कथा आढळतात ज्या सामान्य लोकधारणेपेक्षा अतिशय वेगळ्या, ऐतिहासिक संदर्भांनी समृद्ध आणि संशोधनात्मक आहेत.

अशीच एक थक्क करणारी, अत्यंत दुर्मीळ कथा आढळते 'हरिवंश पुराण', 'वायु पुराण' आणि 'ब्रह्मांड पुराण' यांच्या प्राच्य संदर्भांमध्ये. ही कथा आहे साक्षात मोक्षनगरी काशीची, धर्मनिष्ठ राजा दिवोदासाची आणि शंकराचा प्रमुख गण मानल्या गेलेल्या, गणेशपरंपरेत गुंफल्या गेलेल्या 'निकुंभ गणेशा'ची! एका मंदिराच्या उद्ध्वस्त होण्यामागे काशीचे संपूर्ण भविष्य कसे बदलले, याचा हा विस्मयकारक शोध.

प्राचीन काळी काशीनगरीवर सूर्यवंशी परंपरेतील अत्यंत शूर, नीतिमान आणि प्रजावत्सल राजा दिवोदासाचे राज्य होते. राजा दिवोदास इतका धर्मनिष्ठ होता की त्याच्या राज्यात कोणावरही अन्याय होत नव्हता. परंतु या कथेची पार्श्वभूमी अत्यंत आगळीवेगळी आहे – एका विशिष्ट व्यवस्थेमुळे त्या काळात साक्षात देवाधिदेव महादेव काशीमध्ये वास्तव्य करत नव्हते, ते मंदराचल पर्वतावर राहत होते.

शंकरांना आपली लाडकी नगरी काशी सदैव खुणावत होती. त्यांना पुन्हा काशीमध्ये आपले स्थान आणि वास्तव्य प्रस्थापित करायचे होते. परंतु राजा दिवोदास धर्माने राज्य करत असल्याने त्याच्यावर थेट आक्रमण करणे किंवा त्याला बळाने हटवणे शक्य नव्हते. राजाकडून स्वतःहून काही अधर्म घडल्याशिवाय त्याला पदावरून दूर करणे नियमात बसत नव्हते.

यासाठी महादेवांनी आपल्या सर्व गणांचा अधिपती, ज्याला पुराणांमध्ये 'गणेश' किंवा 'गणेश्वर' अशा उपाधीनेही संबोधिले आहे, त्या महाबलाढ्य 'निकुंभ' गणाला काशीमध्ये पाठवण्याचे ठरवले. कोणत्याही हिंसेविना, सौम्य मार्गाने राजाच्या हातून चूक घडवून आणण्याची आणि परिस्थिती अनुकूल करण्याची जबाबदारी निकुंभावर सोपवण्यात आली.

शंकरांचा आदेश शिरसावंद्य मानून निकुंभ काशीनगरीत दाखल झाला. त्याने काशीतील एका सात्त्विक आणि निष्ठावंत मंकण नावाच्या ब्राह्मणाला स्वप्नात दृष्टांत दिला.

त्या दृष्टांतात निकुंभाने ब्राह्मणाला सांगितले की, शहराच्या बाहेरील प्रवेशद्वाराजवळ एका योग्य जागेची निवड करून तिथे माझी प्रतिमा स्थापित कर. मंकणाने सकाळी उठून राजा दिवोदासाची रीतसर अनुमती घेतली आणि काशीच्या वेशीवर मोठ्या भक्तिभावाने निकुंभाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली.

सुरुवातीला ती एक साधी मूर्ती वाटत होती, परंतु अल्पावधीतच तिथे चमत्कार घडू लागले. निकुंभ भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करू लागला. जो कोणी त्या मंदिराच्या दारात जात असे – कोणाला धन हवे असेल तर धन, कोणाला दीर्घायुष्य, तर कोणाला पुत्रप्राप्ती – निकुंभाच्या केवळ दर्शनाने लोकांच्या झोळ्या भरू लागल्या. अल्पावधीतच निकुंभाची कीर्ती काशीच्या कानाकोपऱ्यात पसरली. सामान्य प्रजा त्याला साक्षात विघ्नहर्ता मानून पूजू लागली.

निकुंभाचा महिमा जसजसा वाढला, तशी ही वार्ता राजवाड्यात पोहोचली. राजा दिवोदासाची पट्टराणी 'सुयशा' हिला दीर्घकाळापासून पुत्रप्राप्तीची तीव्र आस होती. राज्याला वारस हवा होता.

राणी सुयशा मोठ्या आशेने, सुवर्णथाळे आणि पूजेचे साहित्य घेऊन निकुंभाच्या मंदिरात गेली. तिने अत्यंत निष्ठेने, उपवास–तप करून निकुंभाची वारंवार पूजा केली आणि कुलदीपासाठी पुत्रप्राप्तीचा वर मागितला. राणी अनेक दिवस त्या मंदिरात खेटे घालत राहिली.

परंतु इथेच नियतीचा आणि महादेवांच्या योजनेचा खेळ सुरू झाला! ज्या निकुंभाने सामान्य गरिबांच्या, वाटसरूंच्या साध्या इच्छाही तात्काळ पूर्ण केल्या होत्या, त्याने राजाच्या राणीची मात्र पुत्रप्राप्तीची इच्छा पूर्ण केली नाही. राणीची प्रत्येक प्रार्थना निकुंभाने निष्फळ ठरवली. तिची झोळी रिकामीच राहिली.

आपल्या राणीची अशी उपेक्षा पाहून राजा दिवोदासाचा संयम सुटला. धर्माने आणि न्यायाने चालणाऱ्या राजाच्या मनात तीव्र संताप आणि अपमानाची भावना दाटून आली.

ज्या देवतेने संपूर्ण प्रजेला वरदान दिले, तीच देवता राजाच्या धर्मपत्नीला वंचित ठेवून एका प्रकारे राजघराण्याचा अवमान करत आहे, असा विचार राजाच्या मनात घर करून बसला. संतापाच्या भरात विवेकाचा लोप झाला. ज्या राजाने आजवर धर्माचे रक्षण केले होते, त्याने रागाच्या भरात सैनिकांना थेट आदेश दिला की, त्या निकुंभाचे मंदिर तात्काळ जमीनदोस्त करण्यात यावे!

सैनिकांनी राजाच्या आज्ञेने काशीच्या वेशीवरील ते पावन मंदिर पाडून टाकले. मूर्तीची विटंबना झाली आणि निकुंभाचे स्थान उद्ध्वस्त झाले. राजाच्या हातून अनवधानाने का होईना, परंतु एका देवस्थानाचा उच्छेद करण्याचा महापापी अधर्म घडला.

आपले मंदिर उद्ध्वस्त झालेले पाहून निकुंभाच्या क्रोधाचा भडका उडाला. ज्या क्षणाची योजना आखली गेली होती, तो क्षण प्रत्यक्षात आला होता. निकुंभाने राजा दिवोदासाला आणि त्याच्या काशीनगरीला एक भयंकर शाप दिला.

त्या शापामुळे राजाचे धर्मबळ एका क्षणात नष्ट झाले. काशीमध्ये अनागोंदी माजली. दुष्काळ, रोगराई आणि संकटांची मालिका सुरू झाली. ती वैभवशाली काशी ओसाड पडू लागली. राजा दिवोदासाला शेवटी आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला आणि नियतीपुढे नतमस्तक होऊन त्याला काशीचा त्याग करावा लागला. पुढे याच घटनेमुळे भगवान शंकरांचे काशीमध्ये सदेह पुनरागमन होण्याचा आणि विश्वनाथाचे अधिष्ठान कायमचे प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा झाला.

पुराणपरंपरेनुसार, पुढे पश्चात्ताप म्हणून निकुंभाचे मंदिर पुन्हा सन्मानाने उभारले गेले आणि काशीच्या क्षेत्ररक्षकांमध्ये त्याला अत्यंत मानाचे स्थान प्राप्त झाले.

ही कथा वरवर पाहता एका गणाची वाटली, तरी गणेश पुराणातील आणि शैव आगमांमधील गूढ संदर्भ याकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहतात.

वेदांमध्ये आणि प्राचीन पुराणांमध्ये 'गणेश' ही संज्ञा सुरुवातीला शिवाद्वारे नियंत्रित असलेल्या विविध गणांच्या प्रमुखांसाठी वापरली जात असे. हरिवंश आणि वायु पुराणात निकुंभाला गणाधिपती म्हटले आहे. त्यामुळेच अनेक प्राचीन संदर्भांमध्ये निकुंभाचा उल्लेख 'निकुंभ गणेश' म्हणूनच येतो.

काशीमध्ये आजही जे 'छप्पन विनायक' (५६ गणेश मंदिरे) आहेत, त्यामागील मूळ इतिहास हाच आहे की शिवाने काशीला सुरक्षित करण्यासाठी आणि ओसाड काशीचे रक्षण करण्यासाठी आपल्या विविध गणांना गणेश रूपात शहराच्या वेशींवर स्थापित केले होते. निकुंभ हे त्या आद्य क्षेत्ररक्षक परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचे आणि ज्वलंत रूप आहे.

।।गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया।।



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६



तीर्थंकर कॉलनी, अहिल्यानगर येथे आनंद जैन पाठशालाचा उद्‌घाटन समारंभ महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा व संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म सा यांच्या पावन सानिध्यात उत्साहात झाला.

# तीर्थंकर कॉलनीमध्ये आनंद जैन पाठशाळा प्रारंभ

**सपना है आनंद गुरुवर का, सुसंस्कारित बालक हो हर घर का।**

नगर – राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म. सा. १९ व्या शतकातील महापुरुष, दीर्घद्रष्टा संत होते. आचार्य भगवंतांनी जैन भागवती दीक्षा ग्रहण केल्या नंतर विविध ठिकाणी जैन पाठशाळा सुरु करुन आपल्या जनहितार्थ कार्याची सुरुवात केली होती. त्यांचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने आचार्य भगवंत यांच्या कृपाशिषाने तसेच महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा यांच्या सत्प्रेरणेने व संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म सा यांच्या मार्गदर्शनाने आनंद नवकार परिवार ट्रस्ट च्या अंतर्गत महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये आनंद जैन पाठशाला कार्यरत आहे. मुला – मुलींना जैन संस्कार व शिक्षा देवून त्यांच्या उज्वल भविष्यला आकार दिला जातो. पाश्चात्य संस्कृतीचा अनुकरण होत असलेल्या वर्तमान परिस्थितित सुसंस्कारांची नितांत आवश्यकता भासत आहे.

या श्रृंखलेत तीर्थंकर कॉलनी, अहिल्यानगर येथे आनंद जैन पाठशालाचा उद्‌घाटन समारंभ महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा व संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म सा यांच्या पावन सानिध्यात उत्साहात झाला. यावेळी श्री आलोकऋषिजी म सा यांनी आपल्या वक्तव्यात सांगितले की, आजच्या कॉम्पुटर व कॉम्पिटीशन च्या युगात सुसंस्कारांना अतिशय महत्व आहे. सुसंस्कारांमुळे पालकांना मुलांच्या भविष्याची चिंता कमी होण्यास मदत होते. राम असो या महावीर असो किंवा श्रीकृष्ण असो, आई – वडिलांनी दिलेल्या संस्कारांमुळे ते महापुरुष झाले. सुसंस्कारांचे बीजारोपण लहान वयातच होत असते. गुरुदेव श्री कुंदनऋषिजी म सा यांनी आपल्या प्रबोधनात सांगितले की, लहान मुलांमध्ये भरपूर क्षमता व जीवनात खूप काही मिळविण्याची संभावना असते. त्यांना सुसंस्कारित करण्याचा विडा श्री आलोकऋषिजी म सा यांनी उचलला आहे. विविध ठिकाणी पाठशाळा चालू करुन धार्मिक, नैतिक, सामाजिक संदेश दिला जात आहे. आजचा बालक भविष्यात चांगला नेता, चांगला श्रावक होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

यावेळी विनोद गांधी, जवाहर चंगेडिया, संजय गुगळे, प्रकाश छल्लानी, मोहन बरमेचा, संजय बोरा, प्रकाश फिरोदिया, सतिश चंगेडिया, निकिता शिंगवी, श्रुति गांधी, सुप्रिया छल्लानी, मेघा बोरा, समता बोरा उपस्थित होते, अशी माहिती आनंद नवकार परिवार ट्रस्टचे सेक्रेटरी मनोजकुमार शेटीया यांनी दिली.



विजया लक्ष्मी लईचेट्टी व गायत्री आवटी यांनी आकर्षक 'कृष्णलीला' हा देखावा साकारला. (छायाचित्र – लहू दळवी)

# 'गौरी–गणपती'निमित्त 'कृष्णलीला' देखावा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेचे मुख्य लेखापरीक्षक गणेश लईचेट्टी यांच्या घरी गौरी–गणपतीचे धार्मिक उत्साहात आगमन झाले. गौरी–गणपती सणानिमित्त लईचेट्टी कुटुंबीयांच्या वतीने आकर्षक फुलांची सजावट, रांगोळी तसेच धार्मिक वातावरणात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी विजया लक्ष्मी लईचेट्टी व गायत्री आवटी यांनी आकर्षक 'कृष्णलीला' हा देखावा साकारला. या देखाव्याच्या माध्यमातून श्रीकृष्णाच्या कार्याचे व त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे दर्शन घडविण्यात आले.

गौरी–गणपतीच्या आगमनानिमित्त घरामध्ये आकर्षक फुलांची सजावट आणि सुंदर रांगोळी काढण्यात आली होती.

# राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त २३ सप्टेंबर रोजी गुणे आयुर्वेद महाविद्यालयात विविध कार्यक्रम

नगर – गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयात २३ सप्टेंबर रोजी ११ व्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड. सचिन जगताप व उपाध्यक्ष आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य तपासणी शिबीर, विविध प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे यांनी दिली.

National Ayurveda Day
राष्ट्रीय आयुर्वेद दिवस

उपप्राचार्य डॉ.सुरज ठाकुर यांनी सांगतले, राष्ट्रीय आयुर्वेदिक दिनानिमित्त महाविद्यालयात विशेष आयुर्वेद उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये डायबिटीस रुग्णांवर आयुर्वेदिक उपचार व आहार यावर तज्ज्ञ डॉक्टर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच आयुर्वेद वनस्पतींचे प्रदर्शन, महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रोजेक्टचे प्रदर्शन आयोजित केले आहे. याशिवाय नागरिकांना योगा संदर्भात मार्गदर्शन, विशेष पंचकर्म उपचार सुविधा माहिती या ठिकाणी मिळणार आहे.

यावेळी संस्थेचे मानद सचिव डॉ. विजय भंडारी, संचालिका वैशाली ससे, संचालक, प्राध्यापक डॉक्टर व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. याचा नागरिकांनी सकाळी १० ते सायंकाळी ५ वेळेत लाभ घ्यावा, अशी आवाहन करण्यात आले आहे.

## अंड्याची गरमागरम भजी

झटपट रेसिपी

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम भजी खायची लहर येते. अशावेळी हॉस्टेलमध्येच तुम्ही भजीचा घाट घालू शकता. बटाटा, कांदा, पालक या भजी आपण नेहमीच खातो. त्यामुळे यंदा अंड्याची भजी ट्राय करायला हरकत नाही.

**साहित्य :** चार उकडलेली अंडी, चार मोठे चमचे बेसन, चिमूटभर मिरपूड, अर्धा चमचा लाल तिखट, अर्धा चमचा ओवा, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ आणि तेल.

**कृती :** उकडलेल्या अंड्यांचे दोन भाग करा. अंड्यांना मीठ आणि मिरपूड लावून ठेवा. आता एका भांड्यात बेसन घ्या. त्यात लाल तिखट, चवीनुसार मीठ, ओला आणि गरजेनुसार पाणी घालून भजीचं पीठ तयार करा. हे पीठ फार घट्ट आणि सैलही नको. त्यामुळे बेताने पाणी घाला. कढईत तेल गरम करून घ्या. अंड्याचे तुकडे बेसनच्या पिठात घोळवा. हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. ही भजी चटणी किंवा सॉससोबत खा.






## शेर की जुबानी

हम तो आईना है,
आईना ही रहेंगे।
फिक्र वो करें...
जिनके चेहरे पर कुछ और
दिल में कुछ और है।

हम तो अल्फाज
ही ढूंढते रह गए,
और वो आंखों
से गझल कह
गए।

जिंदगी एक हसीन ख्वाब है,
जिसमें जीने की चाहत होनी
चाहिये। गम खुद ही खुशी
में बदल जाऐंगे, मुस्कुराने
की आदत होनी चाहिये।

## १६व्या वर्षीच बनला सीए!

अचिव्हर

भारतीय वंशाच्या एका १६ वर्षीय तरुणाने जागतिक स्तरावर देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. लक्ष्मणन मय्यप्पन या तरुणाने अवघ्या १६ वर्षे १४१ दिवसांचा असताना सीए ही आव्हानात्मक पदवी प्राप्त करून जगातील सर्वात तरुण पुरुष 'सीए' होण्याचा बहुमान मिळवला आहे. त्याच्या या अभूतपूर्व कामगिरीची नोंद थेट 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये झाली आहे.

लक्ष्मणनच्या फायनान्स (वित्त) क्षेत्रातील प्रवासाला कोरोना साथीच्या काळात सुरुवात झाली. दहावीची परीक्षा झाल्यानंतर त्याने वयाच्या १५व्या वर्षी 'असोसिएशन ऑफ चार्टर्ड सर्टिफाइड अकाऊंटंट्स' (एसीसीए) या जागतिक स्तरावरील 'सीए' कोर्सची तयारी सुरू केली. लॉकडाऊनच्या काळात मिळालेल्या मोकळ्या वेळेचा पूर्ण वापर करत त्याने अवघ्या एका वर्षात हा संपूर्ण कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला. ३० जून २०२१ रोजी तो दुबईत अधिकृतपणे जगातील सर्वात तरुण 'सीए' बनला.

'सीए' बनल्यानंतरही लक्ष्मणन थांबला नाही. त्याने आपले शिक्षण चालू ठेवत अवघ्या १८ व्या वर्षी कठीण मानली जाणारी 'सीएफए' पदवी प्राप्त केली. सध्या तो 'एमएससी इन फायनान्स'चे शिक्षण घेत असून दुबईतील 'सेंच्युरी फायनान्शियल' या नामांकित कंपनीत 'सीनिअर रिसर्च ॲनालिस्ट' म्हणून कार्यरत आहे. येथे तो गुंतवणूक संशोधन आणि आर्थिक बाजारातील महत्त्वाच्या निर्णयांवर काम करतो.

शिक्षण आणि नोकरीव्यतिरिक्त लक्ष्मणनला एक वेगळा आणि रंजक छंद आहे. तो रिकाम्या वेळेत घड्याळे डिझाइन करतो आणि तयार करतो. आपल्या या प्रवासावर बोलताना तो म्हणाला, की मी कधीही कोणत्या विक्रमाचा पाठलाग करण्यासाठी किंवा स्पर्धेसाठी शिक्षण घेतले नाही. एखादी गोष्ट वेगापेक्षा जिज्ञासेने शिकली जाते, तेव्हा त्याचे परिणाम अधिक अर्थपूर्ण असतात.



## टेक्नो टॉक

### लॅपटॉप अचानक स्लो होतोय?




लॅपटॉप ही प्रत्येकाची महत्त्वाची गरज बनली आहे; पण काम करत असताना लॅपटॉप अचानक स्लो होणे, ॲप्स ओपन व्हायला वेळ लागणे किंवा स्क्रीन हँग होणे अशा समस्यांना अनेकांना सामोरे जावे लागते. सध्या बाजारात 'डीडीआर ५ रॅम'च्या वाढत्या किमती आणि तुटवड्यामुळे नवे हार्डवेअर खरेदी करणे खिशाला परवडणारे नाही. कोणत्याही खर्चाशिवाय काही सोप्या सिस्टीम सेटिंग्ज आणि योग्य मेमरी मॅनेजमेंटच्या मदतीने लॅपटॉपचा स्पीड सहज वाढवता येतो.

**काय करावे?**

*विंडोजमध्ये कंट्रोल+शिफ्ट + एस्केप दाबून टास्क मॅनेजर ओपन करा. त्यातील स्टार्टअप टॅबमध्ये जाऊन सध्या गरजेत नसलेले ॲप्स 'डिसेबल' करा.

**जास्त रॅम वापरणारे ॲप्स ओळखा**

* विंडोजमध्ये टास्क मॅनेजर आणि मॅकमध्ये ॲक्टिव्हिटी मॉनिटरच्या मदतीने कोणते ॲप सर्वाधिक मेमरी वापरत आहे हे तपासा. गरज नसलेले हेवी ॲप्स तिथूनच थेट बंद करा.


**ब्राउझर टॅब्स आणि बॅकग्राउंड प्रोसेस नियंत्रणात ठेवा**

* ज्या टॅब्जवर काम सुरू नाही ते लगेच बंद करा. 'गूगल क्रोम' किंवा इतर ब्राउझरमधील 'मेमरी सेव्हर' फीचर सुरू ठेवा. यामुळे 'मल्टीटास्किंग' करताना लॅपटॉप स्मूथ चालतो.

**जंक फाइल्स हटवून स्टोरेज रिकामे करा**

* सिस्टीममधील टेम्पररी आणि जंक फाइल्स नियमितपणे डिलीट करा. स्टोरेज मोकळे राहिल्याने सिस्टीमला काम करायला पुरेशी जागा मिळते आणि लॅपटॉपचा स्पीड वाढतो.

## मोबाईल मॅनिया




### मोबाईल लवकर चार्ज करायचाय?

मोबाईल फोन लवकर चार्ज व्हावा आणि चार्जिंगदरम्यान बॅटरीवर कमी ताण यावा, यासाठी काही सोप्या गोष्टी करता येतात. त्यापैकी एक म्हणजे फोन चार्जिंगला लावताना 'एअरप्लेन मोड' सुरू करणे. हा पर्याय सुरू केल्यावर फोनचे मोबाइल नेटवर्क, वायफाय आणि ब्लूटूथ यासारखे वायरलेस कनेक्शन्स बंद होतात. त्यामुळे फोनला सतत सिग्नल शोधण्याची गरज राहत नाही. एअरप्लेन मोडमध्ये नेटवर्कशी संबंधित अनेक प्रक्रिया थांबतात. त्यामुळे फोनचा काही वीज वापर कमी होतो आणि चार्जिंगची प्रक्रिया थोडी वेगाने पूर्ण होऊ शकते. इंटरनेट कनेक्शन बंद असल्यामुळे अनेक ॲप्सची सिंकिंग, नोटिफिकेशन्स आणि इतर ऑनलाइन प्रक्रिया कमी होतात. यामुळे चार्ज होताना बॅटरीचा अनावश्यक वापर टाळला जातो.

चार्जिंगसोबत फोनमध्ये अनेक प्रक्रिया सुरू असतील तर उष्णता वाढू शकते. एअरप्लेन मोडमुळे काही वायरलेस प्रक्रिया बंद राहत असल्याने अतिरिक्त उष्णता कमी होण्यास मदत होऊ शकते. फोन चार्ज होत असताना त्याचा वापर कमी केल्यास बॅटरीवरचा भारही कमी राहतो. एअरप्लेन मोडमध्ये कॉल, मेसेज आणि अनेक नेटवर्क नोटिफिकेशन्स येत नसल्यामुळे फोन चार्जिंगदरम्यान बाजूला ठेवता येतो. त्यामुळे चार्जिंगसोबत फोनचा अनावश्यक वापरही कमी होतो; मात्र एअरप्लेन मोड हा बॅटरीचे आयुष्य वाढवण्याचा जादुई उपाय नाही. फोनची बॅटरी दीर्घकाळ चांगली ठेवण्यासाठी योग्य चार्जिंग सवयी आणि अतिउष्णता टाळणे अधिक महत्त्वाचे आहे.

## आकाशात भरारी घेण्याचे स्वप्न

रोजगारवाटा



भारतातील नागरी विमान वाहतूक क्षेत्र सध्या अत्यंत वेगाने विस्तारत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत या क्षेत्राचा वाटा ५३.६ अब्ज अमेरिकन डॉलरपेक्षा जास्त असून, यामुळे ७५ लाखांहून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे. २०२४ मध्ये 'डीजीसीए'ने १३०० हून अधिक नवीन व्यावसायिक पायलट परवाने (सीपीएल) जारी केले आहेत. आकाशात भरारी घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी हे क्षेत्र रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देत आहे.

पायलट होण्यासाठी भारतात दोन मुख्य मार्ग उपलब्ध आहेत. पहिला पारंपरिक सीपीएल मार्ग आणि दुसरा एअरलाइन्सचा 'कॅडेट पायलट प्रोग्राम'.

वयोमर्यादा : उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे.

शैक्षणिक पात्रता : बारावीमध्ये भौतिकशास्त्र आणि गणित विषयांत किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत.

वैद्यकीय तपासणी : 'डीजीसीए' मान्यताप्राप्त डॉक्टरांकडून प्राथमिक तपासणी.

क्लास १ मेडिकल : भारतीय हवाई दलाने मान्यता दिलेल्या डॉक्टरांकडून डोळे, ईसीजी, रक्त आणि नाक-कान-घशाची सखोल तपासणी.

प्रशिक्षणाचा टप्पा : ग्रॅज्युएशन ते फ्लायिंग

पात्रतेचे निकष पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना पुढील टप्प्यांतून जावे लागते

*ग्राऊंड ट्रेनिंग परीक्षा : यात हवामानशास्त्र, एअर रेग्युलेशन, नेव्हिगेशन आणि रेडिओ टेलिफोनी या विषयांचा समावेश असतो. या लेखी परीक्षेत किमान ७० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे.

*फ्लाइट ट्रेनिंग (२०० तास) : लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर 'फ्लाइंग ट्रेनिंग ऑर्गनायझेशन' (एफटीओ) मध्ये २०० तासांचा विमान उड्डाणाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागतो.

*टाइप रेटिंग : लहान विमानांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रवासी विमाने (उदा. बोईंग किंवा एअरबस) चालवण्यासाठी या विशेष परवान्याची गरज असते.

**ट्रेनिंगसाठी विविध देशांत येणारा खर्च**

पायलट बनण्यासाठी प्रशिक्षणाचा खर्च तुम्ही कोणत्या देशात ट्रेनिंग घेता यावर अवलंबून असतो.

भारत : भारतात १४ ते १५ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी ५० ते ५५ लाख रुपयांचा खर्च येतो.

अमेरिका : अमेरिकेत हे प्रशिक्षण अवघ्या १० महिन्यांत पूर्ण होते आणि त्यासाठी ५० ते ५२ लाख रुपये खर्च येतो.

दक्षिण आफ्रिका : दक्षिण आफ्रिकेत १२ ते १४ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी ३५ ते ४० लाख रुपयांचा खर्च येतो.

**पगार आणि प्रगतीच्या संधी**

फर्स्ट ऑफिसर : सुरुवातीला फर्स्ट ऑफिसर म्हणून काम करताना दरमहा १.२५ लाख ते २.५० लाख रुपये पगार मिळतो.

कॅप्टन : कॅप्टनपदावर पदोन्नती झाल्यानंतर दरमहा ४ लाख ते ८ लाख रुपये पगार मिळतो. (कॅप्टन होण्यासाठी किमान १५०० तासांचा उड्डाण अनुभव आणि एटीपीएल परवाना आवश्यक असतो.)

आंतरराष्ट्रीय एअरलाइन्स : आंतरराष्ट्रीय एअरलाईन्स किंवा मध्य पूर्वेतील देशांमध्ये फर्स्ट ऑफिसरला दरमहा ८ ते ९ लाख रुपयांपर्यंत पगार मिळतो.

वर्क-लाइफ बॅलन्स : 'डीजीसीए'च्या नियमांनुसार पायलटला उड्डाणानंतर १२ ते १५ तासांची विश्रांती आणि आठवड्यातून सलग ४८ तासांचा वीकेंड ब्रेक मिळणे बंधनकारक आहे. याशिवाय पायलट पुढे जाऊन अकॅडमी इंस्ट्रक्टर किंवा फ्लाइट डिस्पॅचर म्हणूनही करिअर करू शकतात.

## आयुष्यात प्राधान्यक्रम निवडताना...

ग्रुमिंग

विद्यार्थी अवस्थेपासून वय वाढेपर्यंत प्रत्येक जण आयुष्यातील चढ-उतारांचा अनुभव घेतो. या प्रवासामध्ये प्रत्येकाला वेगवेगळ्या टप्प्यांवर अनेक निर्णय घ्यावे लागतात. काही बरोबर ठरतात, तर काही चुकीचे; परंतु या प्रक्रियेत आपण आयुष्यात कोणत्या गोष्टीला किती महत्त्व देतो आणि कधी देत नाही, हे महत्त्वाचे ठरते. त्यामुळेच 'प्राधान्य' या घटकाला फार महत्त्व आहे.

करिअर या शब्दाचा अर्थ 'शैक्षणिक करिअर' असाच घेतला जातो. प्रत्येक माणूस शिक्षणात करिअर करेल आणि यशस्वी होईल असे नक्कीच नाही. खेळातील करिअर, नाटक, चित्रपट, लेखन, कला, गायन, वाद्यवृंद, उद्योग धंदा, अशा अनेक क्षेत्रांत करिअरच्या संधी आहेत. पाल्यातील कौशल्य, आवड आणि प्राधान्य यावर अंतिम करिअर ठरले पाहिजे. पालकांनी एखाद्या ठरावीक करिअरसाठी मुलांच्या मागे लागणे चुकीचे आहे. आज जग बदलले आहे. करिअर म्हणजे अभ्यास या मानसिकतेमधून पालकांनी बाहेर येऊन पाल्यासाठी नवीन वाटांचा स्वीकार केला पाहिजे. कोणतेही करिअर निवडा; परंतु त्यामध्ये उच्च पातळीचे यश मिळवणे हे ध्येय असणे महत्त्वाचे आहे. योग्य करिअरला प्राधान्य देणे तुमच्या आयुष्याच्या प्रवासात महत्त्वाचा निर्णय ठरतो.

आवडीचा खेळ करिअर म्हणून निवडलात आणि त्यामध्ये देशाकडून खेळण्यापर्यंत प्रगती केली, तरी खेळातील अपेक्षा पूर्ण होत नाहीत. तुम्ही निवडलेल्या खेळासाठी ज्या गोष्टींचे प्राधान्य जास्त आहे, त्यामध्ये तुम्ही जास्त काम करणे महत्त्वाचे ठरते. करिअरच्या सुरुवातीला खेळातील तांत्रिक बाबीत प्रगती करणे, आपला परफॉर्मन्स टिकवणे, नवीन गोष्टी शिकणे या गोष्टींना प्राधान्य दिले जाते. प्रत्येक खेळाडूच्या करिअरमध्ये त्याच्या वयाप्रमाणे प्राधान्य बदलत असते.प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात वेगवेगळ्या फेजमध्ये



वेगळे प्राधान्य ठेवावे लागते; परंतु या प्रवासात प्राधान्य ठरविण्यामध्ये लवचिकता असणे महत्त्वाचे आहे. शिक्षण सुरू असेपर्यंत प्राधान्य अभ्यास व खेळ दोन्हीकडे असणे योग्य राहील. तुम्ही नोकरी करायला लागल्यावर प्राधान्य हे कॉर्पोरेट करिअर असावे. या काळात कुटुंबात कोणतीही अडचण आल्यास प्राधान्य कौटुंबिक स्तरावर दिले पाहिजे. थोडक्यात कधी, कोणत्या गोष्टीला आणि किती प्राधान्य द्यायचे हा निर्णय महत्त्वाचा असतो. आपले वैयक्तिक आयुष्य आणि कुटुंब या दोन गोष्टींना कायमच प्राधान्य दिले पाहिजे. करिअर, पैसा, शिक्षण, यशाचे टप्पे तुमची समाजातील प्रतिष्ठा असे अनेक घटक तुमच्या आयुष्यात प्राधान्य ठरवत असतात.

## टेक्नो वर्ल्ड



### पहिले व्हर्च्युअल प्राणिसंग्रहालय!

नवनवीन प्रयोगांसाठी ओळखल्या जाणाऱ्या इंदूरने आता पर्यटन आणि वन्यजीव शिक्षणाच्या क्षेत्रात आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. शहरातील कमला नेहरू प्राणीसंग्रहालयात देशातील पहिले व्हर्च्युअल प्राणिसंग्रहालय आणि १४-डी सिनेमागृह सुरू करण्यात आले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नागरिक, पर्यटक आणि विशेषतः मुलांना जंगल सफारीचा आभासी अनुभव घेता येणार आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी मॉडेल अंतर्गत सुमारे साडेचार कोटी रुपयांच्या खर्चातून विकसित करण्यात आला आहे. ३६० डिग्री थिएटर आणि १४-डी तंत्रज्ञानामुळे प्रेक्षकांना जंगलात प्रत्यक्ष फिरत असल्याचा अनुभव मिळणार आहे. वन्यजीव अगदी जवळून पाहिल्याचा थरार आणि जंगलातील वातावरणाचा आभासी अनुभव या माध्यमातून घेता येईल. या प्रकल्पाचा विशेष फायदा लहान मुलांना होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच निसर्ग, जंगल आणि वन्यजीवांविषयी माहिती सोप्या आणि आकर्षक पद्धतीने मुलांपर्यंत पोहोचवता येणार आहे. तंत्रज्ञान, पर्यटन आणि पर्यावरण शिक्षणाचा संगम घडवणारा हा प्रकल्प इंदूरच्या पर्यटन क्षेत्राला नवी ओळख देण्याची क्षमता ठेवतो.

## त्याच्या आईचा हस्तक्षेप वाढतोय...

मॅच मेकिंग


मी २१ वर्षांची तरुणी आहे. गेल्या तीन वर्षांपासून एका मुलासोबत रिलेशनशीपमध्ये आहे. आमचं सगळं सुरळीत सुरू होतं. पण त्याने आमच्याबद्दल घरी सांगितल्यानंतर त्याची आई आमच्या विविध गोष्टींमध्ये नाक खुपसू लागली आहे. आधी आमच्यातली भांडणं आम्हीच सोडवायचो. पण आता भांडण झाल्यावर त्याची आई मला फोन करते. कुठे फिरायला जायचं म्हटलं की तो आधी घरच्यांना विचारतो. मध्यंतरी दोन वेळा आम्ही चित्रपट बघायचा प्लॅन केला. पण नेमकी तेव्हाच त्याची आई आजारी पडल्याने सगळंच बारगळलं. मी याबाबत माझ्या मित्राशी बोलले. पण तो मलाच दोष देत आहे. आमच्यात असा विसंवाद कधीच नव्हता. ही परिस्थिती कशी हाताळू?

**उत्तर :** तू या नात्यापासून स्वत:ला थोडं बाजूला कर. तुला कशातून आनंद मिळतो हे ठरव. आयुष्याकडून तुला नेमकं काय हवं आहे हे जाणून घे. प्रियकराकडे तुझ्या भावना व्यक्त कर. त्याच्या वागण्याने दु:ख झाल्याचंही सांग. तुला त्याच्या कुटुंबियांबद्दल आदर वाटत असल्याचं आवर्जून नमूद कर. या नात्याच्या काही मर्यादा ठरव. यामुळे तू प्रियकराला समजून घेऊ शकशील. तसंच त्यालाही ही परिस्थिती हाताळायला वेळ मिळेल. त्याचीही द्विधा मनस्थिती होत असेल. तू आणि आई यांच्या कात्रीत तो सापडला असेल. तसंच लग्नाआधी समुपदेशकांचीही मदत घे.



## पांढरे बूट असे करा स्वच्छ!

फॅशन पॅशन



पांढऱ्या रंगाचे बूट क्लासी लूक देतात; मात्र पांढऱ्या बुटांची स्वच्छता करणे हे मोठे आव्हान असते. एकदा वापरल्यानंतरच त्यावर धूळ-मातीचे डाग दिसू लागतात. काही वेळा बूट इतके खराब होतात की त्यांचा पांढरा रंग काळवंडल्यासारखा दिसतो. अशा वेळी महागडी 'क्लीनिंग सर्व्हिस' घेण्याची गरज नाही. घरात उपलब्ध असलेल्या काही वस्तूंच्या मदतीने पांढरे बूट पुन्हा स्वच्छ करता येतात.

कॅनव्हास किंवा कापडी पांढरे बूट स्वच्छ करण्यापूर्वी त्यांची लेस आणि इनसोल बाहेर काढा. त्यानंतर कोरड्या कपड्याने बुटांवरील धूळ पुसून घ्या. जुन्या टूथब्रशच्या मदतीने बुटांच्या सर्व बाजूंवरील माती आणि धूळ हलक्या हाताने काढा. यानंतर एक कप कोमट पाण्यात सौम्य डिश सोप किंवा लॉन्ड्री डिटर्जंटचे काही थेंब मिसळून द्रावण तयार करा. या द्रावणात ब्रश बुडवून बुटांवर हलक्या हाताने गोलाकार पद्धतीने घासा. स्वच्छ ओल्या कपड्याने साबण पुसून काढा. त्यानंतर बूट मोकळ्या हवेत वाळत ठेवा. बुटांवरचे डाग जुने आणि हट्टी असतील तर थोडी अधिक मेहनत घ्यावी लागेल. सर्वप्रथम बुटांवरील सैल धूळ आणि माती पूर्णपणे काढून टाका. यानंतर एक चमचा बेकिंग सोडा, एक चमचा पांढरा व्हिनेगर आणि थोडे कोमट पाणी मिसळून पेस्ट तयार करा. ही पेस्ट जुन्या टूथब्रशच्या मदतीने डागांवर हलक्या हाताने चोळा. डाग कमी झाल्यानंतर स्वच्छ ओल्या कपड्याने बूट पुसून घ्या आणि मोकळ्या हवेत वाळवा.

पांढऱ्या बुटांना इतर रंगांच्या बुटांच्या तुलनेत अधिक काळजीची आवश्यकता असते. त्यामुळे आठवड्यातून किमान एकदा त्यांची डीप क्लीनिंग करणे फायदेशीर ठरू शकते. प्रथम बुटांवरील धूळ स्वच्छ करा. त्यानंतर एका बादलीत कोमट पाणी घेऊन त्यात थोडे व्हिनेगर आणि कपडे धुण्याचे लिक्विड मिसळा. बूट काही वेळ या द्रावणात भिजवून ठेवा. त्यानंतर ते बाहेर काढून कपडे धुण्याच्या ब्रशने हलक्या हाताने स्वच्छ करा.

## पंजाबमध्ये जाताय? हे आवर्जून पाहा

भटकंती


पंजाब म्हटलं की डोळ्यासमोर मोहरीची शेते, गिद्दा आणि भांगडा नृत्य उभं राहतं; पण पंजाब इतक्यापुरतं मर्यादीत नाही. पंजाब हे इतिहास, संस्कृती, धर्म आणि रम्य निसर्गाचं एक अद्भुत मिश्रण आहे. या राज्याच्या सौंदर्यामुळे इथे एकदा आलेला माणूस पुन्हा-पुन्हा येण्याची इच्छा ठेवतो.

पंजाबमधील काही ठिकाणे अशी आहेत, जिथे फिरण्यासाठी परदेशी पर्यटकही आतुर असतात.

✽ **सुवर्ण मंदिर, अमृतसर:** सुवर्ण मंदिर हे केवळ शीखांचे प्रमुख तीर्थस्थळ नाही, तर जगातील सर्वात शांत आणि आध्यात्मिक ठिकाणांपैकी एक आहे. येथील पवित्र सरोवर, संगमरवरी वास्तुकला आणि २४ तास चालणारे लंगर (मोफत भोजन) जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.

✽ **वाघा बॉर्डर, अमृतसर:** भारत-पाकिस्तान सीमेवर होणारी 'बीटिंग रिट्रीट सेरेमनी' एक रोमांचकारी अनुभव आहे. देशभक्तीचा जोश, गर्दी आणि सैनिकांची गर्वाने भरलेली चाल परदेशी पर्यटकांनाही भारावून टाकते.

✽ **आनंदपूर साहिब:** पंजाबच्या रूपनगर जिल्ह्यात असलेले हे ठिकाण शीख धर्माचे जन्मस्थान मानले जाते. तख्त श्री केसगढ साहिब आणि वार्षिक 'होला मोहल्ला' सण इथे खूप प्रसिद्ध आहे. इथे होणारे घोडेस्वारी आणि मार्शल आर्टचे थेट प्रदर्शन परदेशी पर्यटकांना आकर्षित करते.



✽ **पटियाला:** पटियालाची राजेशाही परंपरा, रंगीत बाजार आणि संगीताची परंपरा पर्यटकांना वेगळा अनुभव देतात. इथला किला मुबारक आणि बरदारी गार्डन पाहण्यासारखे आहेत. पटियाला सूट आणि पटियाला पेगसारखे शब्द इथूनच लोकप्रिय झाले आहेत.

✽ **रूपनगर:** या शहराला आधी 'रोपड' म्हणून ओळखले जायचे. हे शहर सिंधू संस्कृतीचे एक महत्त्वाचे केंद्र आहे. इथलं रोपड पुरातत्व संग्रहालय आणि सतलज नदीचा किनारा पक्षीप्रेमींसाठी स्वर्ग मानला जातो.

✽ **जलियानवाला बाग, अमृतसर:** १९१९ च्या भीषण हत्याकांडाची आठवण करून देणारी ही जागा. इथल्या भिंतीवर आजही गोळ्यांच्या खुणा पाहायला मिळतात. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा संघर्ष आणि भावना अनुभवण्यासाठी परदेशी पर्यटक इथे नक्की भेट देतात.

✽ **कपूरथला:** कपूरथला फ्रेंच वास्तुकलेसाठी आणि राजेशाही इतिहासासाठी प्रसिद्ध आहे. जगजीत पॅलेस आणि एलिसी पॅलेस ही येथील प्रमुख आकर्षणे आहेत. युरोपीयन शैलीतील राजवाड्यांमुळे याला 'पंजाबचे पॅरिस' असेही म्हणतात.

✽ **फतेहगड साहिब:** गुरू गोबिंद सिंग यांच्या मुलांनी बलिदान दिलेल्या ठिकाणांपैकी हे एक आहे. येथील गुरुद्वारा फतेहगड साहिब हे केवळ शीखांसाठीच नाही, तर प्रत्येक संवेदनशील व्यक्तीने भेट द्यावी, असे महत्वाचे स्थान आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची देखभाल आम्ही करतो; तथागत बुद्धिष्ट सोसायटी संस्थेला वापरासाठी जागा द्यावी

### धम्म प्रशिक्षणासह शालेय शिक्षण घेणाऱ्या बालभन्तेंच्या वास्तव्यासाठीही जागेची मागणी; महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना शिष्टमंडळाचे निवेदन

नगर – शहरातील टिळक रोड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची जागा तथागत बुद्धिष्ट सोसायटी, भारत या संस्थेला विनाअनुदान तत्त्वावर वापरण्यास देण्यात यावी, अशी मागणी शहरातील आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात २१ सप्टेंबर रोजी आंबेडकरी समाजाच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

या स्मारकाच्या ठिकाणी बौद्ध धर्माचे बालभन्ते तसेच भन्ते (धर्मगुरू) वास्तव्यास असून धम्माचे प्रशिक्षण, प्रचार आणि प्रसाराचे कार्य केले जात असल्याचे शिष्टमंडळाने निवेदनात म्हटले आहे. यावेळी भन्ते धम्मपाल, संजय कांबळे, सागर चाबुकस्वार, रोहित आव्हाड, सुनील शिंदे, संजय जगताप, सुहास धीवर, अमर निरभवणे, बंटी साळवे, सिध्दांत कांबळे, दिलीप साळवे, विशाल भिंगारदिवे, सुनील सूर्यवंशी, विजय शिरसाठ, बबन दिवे, शाहबाज शेख, मुशर्रफ खान, शेखर पंचमुख, जयराम आंग्रे, स्वप्नील साठे, गुलाम शेख आदी उपस्थित होते.



टिळक रोड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची जागा तथागत बुद्धिष्ट सोसायटी, भारत या संस्थेला विनाअनुदान तत्त्वावर वापरण्यास देण्यात यावी, याबाबत आंबेडकरी समाजाच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

बालभन्ते येथे धम्म प्रशिक्षणाबरोबरच शालेय शिक्षण घेत असून, महाराष्ट्रातील विविध ठिकाणांहून भन्तेही या स्मारकाला भेट देऊन धम्माचा प्रचार व प्रसार करीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक ही समाजाच्या हितासाठी उभारण्यात आलेली वास्तू असून, तिचा उपयोग सामाजिक व धम्मविषयक उपक्रमांसाठी व्हावा, अशी भूमिका शिष्टमंडळाने मांडली. समाजाच्या हितासाठी लाखो रुपये खर्च करून ही वास्तू उभारण्यात आली आहे. संस्थेच्या माध्यमातून समाजाला धम्मरथ तसेच शववाहिनी मोफत उपलब्ध करून दिली जाते, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तथागत बुद्धिष्ट सोसायटीकडून सन २०२२ पासून या स्मारकाची देखभाल चांगल्या पद्धतीने करण्यात येत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. समाजातील नागरिकांसाठी श्रामणेर शिबिर, धम्म परिषद तसेच वधू–वर सूचक मंडळाचे उपक्रम राबविले जात असल्याचे सांगण्यात आले. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात रविवारी वधू–वर सूचक मंडळाचा उपक्रम मोफत घेतला जात असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या वास्तूची पूर्वी योग्य प्रकारे देखभाल झाली नसल्याने ती जीर्ण अवस्थेत गेली होती. त्यानंतर संस्थेच्या माध्यमातून वास्तूची देखभाल करण्यास सुरुवात करण्यात आली असून, तिचे नूतनीकरण तसेच संस्थेकडे हस्तांतरण करण्याबाबत महापालिका प्रशासनाकडे वेळोवेळी तोंडी व लेखी मागणी करण्यात आल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. १७ सप्टेंबर रोजी महापालिकेकडून आलेल्या पत्राच्या पार्श्वभूमीवर शिष्टमंडळाने आपली भूमिका प्रशासनासमोर मांडली. यापूर्वी संस्थेने केलेल्या मागण्यांबाबत महापालिका प्रशासनाकडून अपेक्षित पत्रव्यवहार किंवा उत्तर मिळाले नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

महापालिकेने इतर समाजांना ज्या पद्धतीने सामाजिक उपयोगासाठी ओपन स्पेस उपलब्ध करून दिली आहे, त्याच धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक संस्थेला विनाअनुदान तत्त्वावर वापरण्यास देण्यात यावे. धम्माचा प्रचार व प्रसार, बालभन्तेंचे शिक्षण आणि समाजोपयोगी उपक्रम सातत्याने सुरू राहण्यासाठी ही जागा संस्थेला देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

#### 'संविधान भवन उभारा; आम्ही एका दिवसात जागा खाली करू!'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या जागेवर संविधान भवन उभारण्याचा महापालिकेचा निर्णय असेल आणि त्यासाठीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण झाली असेल, तर त्यास आमचा विरोध नाही. संविधान भवन व्हावे, ही आमचीदेखील इच्छा आहे. मात्र, महापालिका आयुक्तांनी संविधान भवनाच्या कामाची वर्क ऑर्डर, टी.पी. प्लॅन तसेच निधी मंजुरीची कागदपत्रे समाजासमोर सादर करावीत. ही कागदपत्रे दाखविल्यानंतर भन्ते स्वतःहून एका दिवसात सदर जागा मोकळी करून देतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची पूर्वी मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली होती. त्या ठिकाणी सुरू असलेले गैरप्रकार बंद करून वास्तूची स्वच्छता व देखभाल करण्यात आली. त्यामुळे सध्या ही वास्तू समाजोपयोगी उपक्रमांसाठी वापरली जात आहे. नुकतीच येथे धम्म परिषदही पार पडली. समाजासाठी उपयुक्त असलेल्या या वास्तूचा वापर सुरू असताना महापालिकेने संविधान भवन उभारणीची प्रक्रिया प्रत्यक्षात कोणत्या टप्प्यावर आहे, हे स्पष्ट करावे, असे भन्ते धम्मपाल म्हणाले.



## गुरुवाणी – ५८
## भक्तीचे सामर्थ्य

श्रद्धा, ज्ञान कशाला म्हणतात? जे आहे ते जाणून घेणे. भविष्यात जे होऊ शकते त्यावर काम करणे, भूतकाळाला डोक्यातून काढून टाकणे. पक्षांमध्ये गरूडाला उंच उडण्यासाठी

एफर्टस लागत नाही. तो सहज उडतो. सुधर्मा स्वामींसारखा भिक्षूक दुसरा झाला नाही. तुम्ही धन, संपदा, सुख, सत्तेचे भिक्षूक असता. सुधर्मा स्वामी भगवंतांचे भिक्षू होते. एकदा भगवंताचे भिक्षू बनला तर ते कधीच तुमची साथ सोडत नाहीत. फक्त कानांनी नाही तर पाच इंद्रियांनी ऐकले जाते हे जैन तत्वज्ञान आहे. डोळ्यांनी सुद्धा ऐकले जाऊ शकते. समस्त जगातील प्रत्येक प्राणीमात्र जाणते अजाणतेपणी तीर्थंकरांना शोधत असतो. तुम्ही सुद्धा त्यात आहात. कारण प्रत्येकाला स्वतःला डेव्हलेप करायचे आहे. तीर्थंकर देत काहीच नाही. कारण जो तुम्हाला देतो तो तुम्हाला भिकारी बनवत असतो. भगवान महावीर भीक घेणारे हात नाही बनवत तर हाताला समर्थ बनवतात. जितके लुटारू, पाखंडी, लबाड आहेत ते लोकांना भिकारी बनवत असतात. नेते विविध गोष्टी फुकट देऊन जनतेला मूर्ख बनवतात. जनतेला कळत नाही नेते एका हाताने देऊन दुसऱ्या हाताने काढून घेत असतात. तीर्थंकर हे चक्र बदलण्याची शिकवण देतात. पण तुम्ही ज्ञान, श्रद्धेचे भिक्षू बनत नाही तर पैशाचे भिकारी बनता. परमात्माने सांगितले आहे की, तुम्हाला कोणी काही दिले तर त्याची स्तुती करू नका. जो देणारा आहे त्यानेही स्तुतीची अपेक्षा करू नये. असे दाता व भिक्षू दोघांचीही सुगती होते. विषारी चंडकौशिकलाही बदलू शकतो, असा तीर्थंकरांसारखा आत्मविश्वास पाहिजे. ज्याचा स्वतःवर विश्वास आहे तोच इतरांवर विश्वास ठेवू शकतो. विश्वासासाठी आधी श्रद्धा हवी. जे जे दुकान चालवतात ते ग्राहकांशी विनम्र वागतात पण घरात तितके सौजन्याने वागत नाहीत, हे वास्तव आहे. एखाद्याच्या वाईटपणावर भरवसा करू नका पण एखाद्याच्या चांगुलपणावर भरवसा केल्याशिवाय राहू नका. घरातील लोकांच्या चांगुलपणावर विश्वास ठेवा. भगवानांवर सगळेच श्रद्धा ठेवतात. पण चंडकौशिक सुद्धा भगवान होऊ शकतो ही भगवान महावीरांची श्रद्धा होती, विश्वास होता. म्हणून तीर्थंकर अद्भुत आहेत, वेगळे आहेत. ज्याच्यावर तुमची श्रद्धा असती तो श्रद्धेय होतो. मूर्ती भगवान वाटते कारण श्रद्धा असते. 'भगवान को जन्म देणे का सामर्थ्य भक्ती में है'. तीर्थंकरांची अनंत जीवांवर श्रद्धा, विश्वास होता. भगवान पहायचे असतील तर भक्ताच्या हृदयात पहा.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# 'एल निनो पाणीबाणी'चा इशारा; महाराष्ट्रात २३ सप्टेंबरपासून जलसतर्कतेचा बिगुल

### पावसातील तूट आणि संभाव्य उन्हाळी पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेचे आवाहन

नगर – पावसाने ओढ दिल्याने यंदाच्या जलस्थितीबाबत चिंता वाढत असतानाच आगामी उन्हाळ्यात संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी आतापासूनच जलनियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे 'एल निनो पाणीबाणी' ही सामाजिक जलसतर्कता घोषणा करण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्यापासून शेतीच्या सिंचनापर्यंत प्रत्येक थेंबाचा जबाबदारीने वापर करण्याचा संदेश या अभियानातून देण्यात येणार आहे.

देशातील मान्सूनची स्थिती आणि एल निनोच्या पार्श्वभूमीवर पाणी नियोजनाचे महत्त्व वाढले आहे. भारत मौसम विज्ञान विभागाने २०२६च्या मान्सूनसाठी देशपातळीवर दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. मे महिन्याच्या अद्ययावत अंदाजात जून ते सप्टेंबर कालावधीतील पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या सुमारे ९० टक्के राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती.

एल निनो म्हणजे नेमके काय? मध्य आणि पूर्व विषुववृत्तीय प्रशांत महासागराच्या समुद्रपृष्ठाच्या तापमानात होणारी असामान्य वाढ आणि त्यासोबत वातावरणीय बदलांची मालिका याला एल निनो म्हटले जाते. त्याचा भारतीय मान्सूनवर परिणाम होण्याची शक्यता असली तरी प्रत्येक वर्षी आणि प्रत्येक प्रदेशात त्याचा परिणाम समान असेलच असे नाही. त्यामुळे केवळ एल निनोच्या अंदाजावर अवलंबून न राहता स्थानिक पर्जन्यमान, धरणांमधील उपलब्ध साठा, भूजलपातळी आणि पाण्याची प्रत्यक्ष मागणी यांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक आहे. संघटनांच्या मते, पावसाची उपलब्धता, जलसाठ्यांची स्थिती आणि वाढती पाण्याची गरज यांचा आतापासूनच ताळमेळ घालणे गरजेचे आहे. विशेषतः कमी पाऊस झालेल्या आणि जलसाठा अपुरा असलेल्या भागांत नियोजनाचा अभाव राहिल्यास आगामी उन्हाळ्यात पिण्याचे पाणी, शेती, पशुधन तसेच ग्रामीण रोजगारावर ताण निर्माण होऊ शकतो.

या अभियानाचा महत्त्वाचा भाग म्हणून प्रत्येक गावाने जलअंदाजपत्रक तयार करावे, अशी भूमिका मांडण्यात येणार आहे. गावात उपलब्ध असलेले पाणी, धरणे, तलाव, विहिरी, बोअरवेल, भूजलसाठा तसेच विविध क्षेत्रांची पाण्याची गरज यांचा हिशेब तयार करून तो नियमितपणे नागरिकांसमोर सार्वजनिक करावा, अशी मागणी करण्यात येणार आहे. संभाव्य पाणीटंचाईच्या काळात पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता आणि पशुधन या अत्यावश्यक गरजांना प्रथम प्राधान्य देण्याची गरज आहे. उपलब्ध पाण्याचे न्याय्य वाटप करण्यासाठी स्थानिक पातळीवर स्पष्ट आराखडा तयार करण्याचे आवाहनही करण्यात येणार आहे. शेती क्षेत्रातही 'पाणी आहे म्हणून पीक' नव्हे, तर 'उपलब्ध पाण्यानुसार पीक' या दृष्टिकोनातून नियोजन करण्याची गरज व्यक्त करण्यात येणार आहे. जमिनीतील ओलावा, पिकांची पाण्याची गरज आणि उपलब्ध सिंचनसाठा यांचा विचार करून शेतकऱ्यांना पीकनियोजनासाठी मार्गदर्शन करावे. योग्य ठिकाणी ठिबक व तुषार सिंचनासाठी अधिकाधिक प्रोत्साहन आणि सहाय्य देण्याची मागणी करण्यात येणार आहे.

घरगुती वापरातील पाण्याचा अपव्यय थांबविण्याबरोबरच शहरातील आणि गावातील सार्वजनिक नळ, जलवाहिन्या व पाण्याच्या टाक्यांमधून होणारी गळती तातडीने रोखण्याची गरज आहे. अनावश्यक धुलाई, वाहून जाणारे पाणी आणि पाण्याचा बेफाम वापर टाळून प्रत्येक नागरिकाने जलसंवर्धनात सहभागी व्हावे, असे आवाहन केले जाणार आहे. पावसाचे पाणी साठवणे, जलसंधारणाची कामे वाढवणे, योग्य पद्धतीने भूजल पुनर्भरण करणे आणि प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पिण्याव्यतिरिक्त कामांसाठी पुनर्वापर करणे या उपायांवरही भर देण्यात येणार आहे. उद्योगांनीही त्यांच्या पाणीवापराचे ऑडिट करून पुनर्वापर आणि बचतीच्या उपाययोजना स्वीकाराव्यात, अशी भूमिका संघटनांची आहे. 'आजचा थेंब जपा उद्याचे जीवन वाचवा!' आणि 'घराघरात पाणीबचत; गावागावात जलअंदाजपत्रक!' या संदेशातून नागरिकांमध्ये जलसतर्कता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा धोका ओळखून आधीच नियोजन करणे अधिक महत्त्वाचे आहे. प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था, शेतकरी, उद्योग आणि नागरिक यांनी एकत्रितपणे जलव्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारल्यास संभाव्य संकटाची तीव्रता कमी करण्यास मदत होऊ शकते, अशी भूमिका पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्याकडून मांडण्यात येणार आहे. उपलब्ध हवामान व जलसाठा माहितीचे सातत्याने परीक्षण करून त्यानुसार स्थानिक निर्णय घेणे हीच या जलसतर्कता अभियानाची प्रमुख दिशा असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे २३ सप्टेंबरला अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयातून 'एल निनो पाणीबाणी'च्या माध्यमातून जलसंकटाच्या शक्यतेकडे गांभीर्याने पाहण्याचा आणि आजपासूनच प्रत्येक थेंबाचे नियोजन करण्याचा संदेश दिला जाणार आहे.

# वाडियापार्कमधील महादेव मंदिर परिसरामध्ये अवैध धंदे; दारू-गांजा विक्री व सेवनाचा आरोप

### पुजाऱ्यांना धमकी, वस्तूंची तोडफोड पोलिसांकडे कारवाईची मागणी; महिला, विद्यार्थी, खेळाडू आणि भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न; जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – वाडियापार्क क्रीडा संकुल परिसरातील महादेव मंदिराच्या ठिकाणी नशेखोर प्रवृत्तींकडून कथितरित्या सुरू असलेल्या अवैध धंद्यांना तसेच गुंडगिरीच्या प्रवृत्तींना आळा घालून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या परिसरात अवैध दारू व गांजाची विक्री तसेच सेवन सुरू असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला असून, त्यामुळे मंदिरात येणारे भाविक तसेच क्रीडा संकुलात येणाऱ्या महिला, विद्यार्थी आणि खेळाडूंच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. याबाबत सतीश अशोक सायंबर यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे.


वाडियापार्कमधील महादेव मंदिर परिसरात धुम्रपान करताना समाजकंटक.

निवेदनानुसार, वाडियापार्क क्रीडा संकुलातील महादेव मंदिर हे सार्वजनिक ठिकाण असून, गेल्या काही दिवसांपासून या परिसरात काही व्यक्तींकडून अवैध दारू व गांजाची विक्री आणि सेवन उघडपणे सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच काही समाजकंटक व गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

मंदिर परिसरातील पुजारी तसेच दर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांना संबंधितांकडून त्रास दिला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असून, विशेषतः महिला व मुलांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

दोन दिवसांपूर्वी काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी मंदिरातील काही वस्तूंची तोडफोड करून मंदिराची विटंबना केली. या प्रकारातून परिसरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच मंदिरातील पुजाऱ्यांना जीवे मारण्याची धमकी दिली जात असल्याचेही निवेदनात आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात अनुचित प्रकार घडण्यापूर्वी पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तींची चौकशी करून, तक्रारीत नमूद केलेल्या आरोपांची सत्यता तपासावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी सतीश सायंबर यांनी केली आहे.

वाडियापार्क क्रीडा संकुलात नियमितपणे महिला खेळाडू, विद्यार्थी, नागरिक तसेच विविध क्रीडा प्रकारांसाठी येणाऱ्या व्यक्तींची मोठी वर्दळ असते. त्याचबरोबर महादेव मंदिरात भाविकांचीही ये–जा सुरू असते. त्यामुळे या संवेदनशील परिसरात पोलिसांची नियमित गस्त वाढविणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे. जिल्हा पोलीस प्रशासनाने या तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन मंदिर परिसराची पाहणी करावी, अवैध धंद्यांबाबत तपास करावा, परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक ती प्रतिबंधात्मक कारवाई करावी आणि मंदिर परिसरात नियमित पोलीस गस्त सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.


स्नेहालय संचालित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटलच्या अंतर्गत नागापूर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद लाभला.

# स्नेहालय संचालित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटलच्या अंतर्गत नागापूर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिरास प्रतिसाद

नगर – लिंबाशेठ नागरगोजे यांच्या प्रेरणेने व नगरसेवक बाबूशेठ नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्नेहालय संचालित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर यांच्या वतीने २० सप्टेंबर रोजी सिद्धेश्वर मंदिर, पितळे कॉलनी, नागापूर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सायंकाळी ५ ते ८ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला परिसरातील नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

शिबिरात सुमारे २५० नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला. तसेच गरजू रुग्णांना बाबूशेठ नागरगोजे यांच्या वतीने चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

शिबिरामध्ये नागरिकांची सामान्य आरोग्य तपासणी, महिलांच्या आरोग्यविषयक समस्या, लहान मुलांची तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखर, तापमान, रक्तगट, ऑक्सिजन पातळी, हिमोग्लोबिन, वजन व नाडी तपासणी आदी आरोग्यसेवा देण्यात आल्या. गरजेनुसार औषधांचे वाटप, चष्म्यांचे वाटप, आरोग्यविषयक मार्गदर्शन व नागरिकांच्या आरोग्यविषयक शंकांचे निरसन करण्यात आले. तसेच केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या विविध आरोग्यसेवांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व आणि आरोग्याची योग्य वेळी काळजी घेण्याबाबत जनजागृती करण्यात आली. नागरिकांनी शिबिराला प्रतिसाद देत आयोजक तसेच केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.

केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या टीमने शिबिराचे नियोजन, व्यवस्थापन व आयोजन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

# कोठला भागातील गोडाऊनमध्ये गोमांसाचा साठा जप्त; गुन्हा दाखल

नगर – शहरातील कोठला भागात हॉटेल कुरेशी चहा–नाश्ता सेंटरच्या पाठीमागील गोडाऊनमध्ये साठवून ठेवलेला गोमांसाचा साठा तोफखाना पोलिसांनी कारवाई करत जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार, नगर शहर डीवायएसपी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तोफखाना पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

कारवाईत उपनिरीक्षक प्रवीण पाटील, उपनिरीक्षक दळवी, उपनिरीक्षक टाके, स.फौ. तनवीर शेख, ए.पी. इनामदार, आव्हाड, भापसे, शाकीर सय्यद, होमगार्ड अधिकारी रावसाहेब आव्हाड तसेच होमगार्ड निमसे, आव्हाड, मुजमुले व भोसले सहभागी होते.

पोलिसांनी गोडाऊन–मधील साठा ताब्यात घेतला असून, याप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मराठी राजभाषा कृती समितीच्या जिल्हा सचिवपदी वृषाली कुलकर्णी यांची निवड

नगर – श्री समर्थ विद्यामंदिर (प्राथमिक विभाग), सावेडी येथील ज्येष्ठ शिक्षिका सौ. वृषाली प्रसाद कुलकर्णी यांची मराठी राजभाषा कृती समितीच्या अहिल्यानगर जिल्हा सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

मराठी भाषेचा प्रचार–प्रसार व संवर्धन अधिक व्यापक स्वरूपात व्हावे, मराठीला ज्ञानभाषेचा सन्मान मिळावा, मराठी माध्यमाच्या शाळांना बळकटी मिळावी आणि विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाजामध्ये मराठी भाषेविषयी अभिमान व आत्मीयता निर्माण व्हावी, या उद्देशाने मराठी राजभाषा कृती समितीच्या राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय निवडीची प्रक्रिया सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून सौ. वृषाली कुलकर्णी यांची जिल्हा सचिवपदी निवड करण्यात आली.


श्री समर्थ विद्यामंदिर (प्राथमिक विभाग), सावेडी येथील ज्येष्ठ शिक्षिका सौ. वृषाली प्रसाद कुलकर्णी यांची मराठी राजभाषा कृती समितीच्या अहिल्यानगर जिल्हा सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानचे संस्थापक अमोल क्षीरसागर यांच्या हस्ते सौ. कुलकर्णी यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. सुलोचना अमोल क्षीरसागर यांच्या उपस्थितीत त्यांच्या निवडीचा सर्वानुमते ठराव संमत करण्यात आला.

मराठी राजभाषा संवर्धन प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रभर मराठी भाषेच्या जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षा, मराठी भाषा जनजागृती अभियान, शैक्षणिक व साहित्यिक उपक्रम, व्याख्याने, शिक्षक–विद्यार्थी प्रबोधन आणि मराठी माध्यमाच्या शाळांना प्रोत्साहन देत मराठी भाषेच्या संवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

जिल्हा सचिव म्हणून सौ. वृषाली कुलकर्णी यांच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील शाळा, शिक्षक, विद्यार्थी, पालक, साहित्यिक व सामाजिक संस्थांना मराठी राजभाषा संवर्धनाच्या कार्याशी जोडून 'मराठी बोलू, मराठी शिकू, मराठी जगू आणि मराठी जपू' या भावनेला बळ देण्याचे कार्य अपेक्षित आहे.

यावेळी श्री समर्थ प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, तसेच विद्यालयातील सहशिक्षिका उपस्थित होत्या.

सौ. वृषाली कुलकर्णी यांच्या निवडीबद्दल मुख्याध्यापिका, विद्यालयातील सहशिक्षिका सौ. शेरकर गीतांजली व श्रीमती जाधव अश्विनी उपस्थित होत्या तसेच इतर शिक्षक–शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मराठी भाषेच्या संवर्धनाच्या चळवळीला सौ. वृषाली कुलकर्णी यांच्या शैक्षणिक अनुभवाचा व कार्यतत्परतेचा निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

